। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक २८० वा । गुरूवार दिनांक २२ जानेवारी, २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### गोठ्यातुन मोटरसायकलची चोरी

परंडा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे महादेव चांगदेव अंधारे, वय ४५ वर्षे, रा. भांडगाव ता. परंडा जि. धाराशिव यांचे भांडगाव येथील शेळ्याच्या गोठ्यातुन महेश, रा. सोलापूर रोड म्हेत्रे चाळ, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर यांनी फिर्यादीचे गोठ्यातुन मोटरसायकल क्र एमएच १३ बीएस ६८८७ वर दोन शेळीच्या पाठी अंदाजे २०,००० किंमतीच्या चोरुन घेवून जात असताना मिळून आला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-महादेव अंधारे यांनी दि.१९.०१.२०२६रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन परंडा पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### पाच हजार रोख व मोबाईलची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर पोलीस ठाणे अंतर्गतफिर्यादी सिंधु देवानंद कांबळे, वय ५२ वर्षे, रा. पापनाश नगर तुळजापूर नाका ता. जि. धाराशिव यांचे देशपांडे स्टॅण्ड येथील विनायक मसाले दुकानाच्या काउंटरवरुन आनंदीबाई रा. भिमनगर धाराशिव, पुजा नितीन कांबळे यांनी दि.१९.०१.२०२६ रोजी १४.०० वा. सु. पाच हजार रोख रक्कम व मोबाईल फोन असा एकुण २०,००० किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-सिंधु कांबळे यांनी दि.१९.०१.२०२६रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे

### अवैध मद्य विरोधी कारवाई

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत माधव रा. बलसुर ता. उमरगा जि. धाराशिव हे दि.१९.०१.२०२६ रोजी येळी शिवारातील रामपूर पाटी येथील राजमुद्रा हॉटेलचे मागे अंदाजे ३,५०० किंमतीची ३५ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये उमरगा पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

तुळजापूर पोलीस ठाणे अंतर्गत महेश ि रा.हंगरगा पाटी ता. तुळजापूर जि. धाराशिव हे दि.१९.०१.२०२६ रोजी बाळसाहेब हंगरगेकर यांचे पत्राचे शेड जगदंबा क्टवा समोर अंदाजे ११,११० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये तुळजापूर पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

कळंब पोलीस ठाणे अंतर्गत आसाराम रा.ईटकुर ता. कळंब जि.धाराशिव हे दि.१९.०१.२०२६ रोजी ईटकुर बाजार मैदान येथे अंदाजे ४,००० किंमतीची ४० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. कळंब पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

## श्री गुरु तेग बहादूर साहेबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त जळकोट आश्रम शाळेत विविध स्पर्धा

धाराशिव दि.२१ जानेवारी (जिमाका) हिंद-दी-चादर म्हणून ओळखले जाणारे श्री गुरु तेग बहादूर साहेबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त श्री कुलस्वामिनी माध्यमिक आश्रमशाळा, जळकोट ता.तुळजापूर,येथे आज २१ जानेवारी रोजी विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमांच्या माध्यमातून धर्मस्वातंत्र्य,मानवता,सहिष्णुता व बलिदानाचे मूल्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचा उद्देश ठेवण्यात आला होता.या कार्यक्रमांतर्गत वकृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा तसेच गीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महात्मा फुले शिक्षण प्रसारक मंडळ,जळकोटचे विद्यमान सचिव तसेच माध्यमिक आश्रम शाळा,जळकोटचे मुख्याध्यापक श्री.एस.एम. चव्हाण यांनी भूषविले.तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून श्री.एन.एम.गुरव उपस्थित होते.

वकृत्व स्पर्धेमध्ये एकूण चार विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून श्री गुरु तेग बहादूर साहेबजी यांच्या जीवनकार्य, त्यांचे धर्मस्वातंत्र्यासाठी दिलेले बलिदान,तसेच समाजासाठी दिलेला त्याग याविषयी प्रभावीपणे विचार मांडले.

निबंध स्पर्धेसाठी एकूण २० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला असून,त्यांनी गुरु तेग बहादूर साहेबजी यांच्या शौर्य,त्याग व मानवतावादी विचारांवर सविस्तर लेखन केले.गीत गायन



स्पर्धेमध्येही विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत प्रेरणादायी गीतांचे सादरीकरण केले.

यावेळी विद्यार्थ्यांना श्री गुरु तेग बहादूर साहेबजी यांच्या जीवनावर आधारित माहितीपर डॉक्युमेंटरी दाखविण्यात आली.या चित्रफितीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या शहीदीचे ऐतिहासिक महत्त्व,३५० व्या शहीदी समागम वर्षाचे औचित्य आणि आजच्या समाजात त्यांच्या विचारांचे असलेले महत्व समजावून सांगण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात श्री.एस.एम.चव्हाण यांनी श्री गुरु तेग बहादूर साहेबजी यांच्या बलिदानामुळेच भारतात सर्व धर्मांना समान स्वातंत्र्य लाभले,असे सांगत विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांपासून प्रेरणा घेऊन जीवनात सत्य, धैर्य व मानवतेचे मूल्य जपावे,असे आवाहन केले.

प्रमुख पाहुणे श्री.एन.एम. गुरव यांनीही गुरु तेग बहादूर साहेबजी यांच्या शौर्यगाथेचा उल्लेख करून अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम व नैतिक मूल्यांची रुजवण होते,असे मत व्यक्त केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाची जाण,अभिव्यक्ती कौशल्यांचा विकास तसेच सामाजिक व नैतिक मूल्यांची जाणीव निर्माण झाली असून,शाळेतील शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.

## तानाजी सावंत यांचे बंधू-पुतणे भाजपामध्ये !

धाराशिव (प्रतिनिधी)- जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना शिंदे गटाचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री आमदार तानाजी सावंत यांच्या कुटुंबात मोठी राजकीय दरी निर्माण झाल्याचे स्पष्ट झाले आहे. सावंत कुटुंबातील दोन महत्त्वाच्या व्यक्ती आमदार तानाजी सावंत यांचे बंधू शिवाजी सावंत आणि पुतणे धनंजय सावंत यांनी भाजपमध्ये अधिकृत प्रवेश केल्याने जिल्ह्यातील राजकारणात खळबळ उडाली आहे. हा प्रवेश केवळ पक्षांतरापुरता मर्यादित न राहता, सावंत कुटुंबातील अंतर्गत मतभेद उघड करणारा ठरला आहे. विशेषतः जिल्हा परिषद निवडणुकीच्या तोंडावर हा राजकीय भूकंप झाल्याने शिंदे गटासाठी ही बाब चिंतेची ठरू शकते. इतकेच नाही तर त्यांना जिल्हा परिषदेची उमेदवारी देखील जाहीर झाली आहे.

खरे तर गेल्या काही काळापासून सावंत कुटुंबात राजकीय मतभेद असल्याची चर्चा सुरू होती. जिल्हा परिषद निवडणुकीसाठी धनंजय सावंत यांनी स्वतंत्र मोर्चेबांधणी सुरू केल्यानंतर आमदार तानाजी सावंत आणि त्यांच्यातील दुरावा स्पष्टपणे समोर आला होता. धनंजय सावंत यांनी विविध ठिकाणी कार्यकर्त्यांच्या स्वतंत्र बैठका घेतल्या, प्रचाराची दिशा ठरवली आणि स्थानिक नेतृत्वाशी थेट संवाद साधला. या बैठकींसाठी लावण्यात आलेल्या बॅनरवर आमदार तानाजी सावंत यांचा फोटो नसल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं होतं. या सगळ्या हालचालींमुळे सावंत कुटुंबात काहीतरी बिनसलं आहे, याची चर्चा अधिक ठळक झाली होती.

दरम्यान, सावंत कुटुंबातील हा वाद आता केवळ अंतर्गत चर्चेपुरता न राहता वेगळ्याच दिशेने वळल्याचं दिसून येत आहे. धनंजय सावंत हे वेगळी राजकीय चूल मांडण्याच्या तयारीत असल्याची चर्चा आधीपासूनच सुरू होती. एकीकडे आमदार तानाजी सावंत हे भाजपविरोधात आक्रमक भूमिका घेताना दिसत होते, तर दुसरीकडे धनंजय सावंत हे भाजपच्या संपर्कात असल्याच्या चर्चा रंगत होत्या. अखेर या चर्चांना पूर्णविराम मिळाला असून धनंजय सावंत यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. त्यांच्या प्रवेशामुळे शिवसेना शिंदे गटाच्या गोटात अस्वस्थता निर्माण झाली असून, स्थानिक कार्यकर्त्यांमध्येही संभ्रमाचं वातावरण आहे.

## पॅटर्न ऑफ युनिटी - आमदार राणा दादा पाटील यांचा जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणुकीसाठी नवा राजकीय पॅटर्न




धाराशिव( रामेश्वर डोंगरे) जिल्ह्यातील राजकारणात नेहमीच वेगळा विचार आणि अनोखा प्रयोग करणारे आमदार राणा दादा पाटील! यांनी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी एक नवा, अभ्यासपूर्ण आणि एकीला बळ देणारा नवा पॅटर्न तयार केला आहे. या पॅटर्नची सध्या सर्वत्र चर्चा होत असून राजकीय वर्तुळात त्याचे कौतुक केले जात आहे.

एका गटामधून दहा-बारा इच्छुक उमेदवार असतील तरी त्या सर्वांना एकत्र ठेवत, त्यांच्या सोबत पक्षाचा निरीक्षक देण्यात येतो. हे सर्व इच्छुक उमेदवार दहा ते बारा दिवस एकत्र राहून, पूर्ण मतदारसंघ पिंजून काढतात. प्रत्येक गावात जाऊन प्रत्येक उमेदवाराची ओळख, त्याचे कार्य, समाजासाठी केलेले योगदान आणि त्याच्यामुळे गावाला होणारा फायदा मतदारांपर्यंत पोहोचवला जातो. या प्रक्रियेत विशेष बाब म्हणजे, सर्व उमेदवार एकमेकांच्या कामाचे कौतुक करतात, रोज संपर्कात राहतात, कार्यक्रम, बैठका आणि जनसंपर्क एकत्रितपणे करतात. गावोगावी एकच संदेश दिला जातो - तिकीट कुणालाही मिळो, पण आम्ही सर्वजण त्या उमेदवाराच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार. त्यामुळे पक्षात फुट न होता एकी टिकून राहते. या पॅटर्नमुळे अंतर्गत स्पर्धा नकारात्मक न राहता सकारात्मक बनते. इच्छुकांमध्ये मत्सराऐवजी समन्वय वाढतो आणि मतदारांसमोरही पक्षाची शिस्त, ताकद आणि एकजूट अधोरेखित होते. हा पॅटर्न केवळ निवडणूक जिंकण्यासाठी नसून दीर्घकालीन संघटन बांधणीसाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहे. हा नवा पॅटर्न फक्त धाराशिवपुरता मर्यादित न राहता संपूर्ण महाराष्ट्रात राबवला जावा, अशी इच्छा स्वतः राणा दादा पाटील यांनी व्यक्त केली आहे. धाराशिवमध्ये या पॅटर्नचा यशस्वी ट्रायल झाल्याने, भाजपमध्ये पुढील काळात हा प्रयोग राज्यभर राबवला जाईल, अशी राजकीय वर्तुळात चर्चा आहे. नेहमीच अनपेक्षित चालीनं विरोधकांना चकवा देणारे राणा दादा पाटील यांचे राजकीय गणित आजही अनेकांना न समजणारे आहे.

पुढील काळात ते आणखी कोणते नवे प्रयोग करतील, याची उत्सुकता वाढली असून, राणा दादा पाटील यांचा पॅटर्न हा शब्द आता राज्याच्या राजकारणात नवा मापदंड ठरत असल्याचे चित्र दिसत आहे.

## प्रधानमंत्री पीक विमा योजनेतील १२ हजार ५७५ अर्जांना पुन्हा संधी २३ जानेवारीपूर्वी त्रुटी दुरुस्तीचे आवाहन

धाराशिव,दि.१९ जानेवारी (जिमाका) प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत खरीप हंगामात एकूण १२ हजार ५७५ पीक विमा अर्ज विमा कंपनीमार्फत विविध कारणांमुळे रद्द करण्यात आले होते, तर १३ हजार ५३९ विमा अर्ज त्रुटी पूर्ततेसाठी ऑनलाईन सेवा केंद्रांकडे परत (Revert) करण्यात आले होते.

या प्रकरणी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीची बैठक २२ डिसेंबर २०२५ रोजी पार पडली.या बैठकीत जिल्हाधिकारी यांनी रद्द झालेल्या १२ हजार ५७५ विमा अर्जदारांना योजनेत सहभाग नोंदविण्यासाठी एक संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने विमा कंपनीने अर्ज त्रुटी पूर्ततेसाठी ऑनलाईन सेवा केंद्रांकडे परत (Revert) करण्याचे निर्देश दिले.यामुळे शेतकऱ्यांना ऑनलाईन सेवा केंद्रामार्फत आवश्यक त्रुटी दुरुस्त करून योजनेतील सहभाग कायम ठेवता येणार आहे.

त्याअनुषंगाने विमा कंपनीने खरीप हंगामात रद्द करण्यात आलेले १२ हजार ५७५ विमा अर्ज १६ जानेवारी २०२६ रोजी ऑनलाईन सेवा केंद्रांकडे परत (Revert) केले असून,त्या विमा अर्जांच्या तालुकानिहाय याद्या तालुका कृषी अधिकारी कार्यालयांना उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.

विमा अर्जांच्या त्रुटी पूर्ततेसाठी केवळ सात दिवसांची मुदत देण्यात आली आहे.त्यामुळे ज्या शेतकऱ्यांचे पीक विमा अर्ज रद्द झालेले आहेत, त्यांनी ज्या ऑनलाईन सेवा केंद्रामार्फत पीक विमा अर्ज भरलेला आहे,त्या ऑनलाईन सेवा केंद्राशी तातडीने संपर्क साधून आवश्यक कागदपत्रांसह २३ जानेवारी २०२६ पूर्वी आपल्या विमा अर्जाची त्रुटी पूर्तता करून घ्यावी,अन्यथा संबंधित विमा अर्ज रद्द होण्याची शक्यता आहे.

तरी शेतकऱ्यांनी अंतिम मुदतीची वाट न पाहता त्वरित संबंधित ऑनलाईन सेवा केंद्राशी संपर्क साधून आपल्या पीक विमा अर्जातील त्रुटी आवश्यक कागदपत्रांसह दुरुस्त करून घ्याव्यात,असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रेरणादायी मरणोत्तर देहदान ; धाराशिवमधील आठवे देहदान

धाराशिव,दि.२० जानेवारी(जिमाका) समाजासाठी प्रेरणादायी ठरणारे आठवे मरणोत्तर देहदान शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव येथे पार पडले.ईटकूर, ता. कळंब येथील ६५ वर्षीय कै.श्रीमती आशाबाई गोविंद गंभीरे यांचे उपचारादरम्यान निधन झाले.त्यांच्या जिवंतपणी व्यक्त केलेल्या इच्छेनुसार व पूर्वी केलेल्या संकल्पानुसार त्यांचे मरणोत्तर देहदान शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,धाराशिव येथे करण्यात आले.



कै.आशाबाई गंभीरे व त्यांचे पती श्री.गोविंद गंभीरे या वृद्ध दाम्पत्याने जिवंतपणीच देहदानाचा संकल्प केला होता.पत्नीच्या निधनानंतर पती श्री.गोविंद गंभीरे यांनी हा संकल्प प्रत्यक्षात उतरवून समाजासमोर एक आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या या निर्णयामुळे वैद्यकीय शिक्षण व संशोधनासाठी मोलाची मदत होणार आहे. या देहदानामुळे वैद्यकीय विद्यार्थ्यांना शरीररचना अभ्यास व संशोधनासाठी उपयुक्त संधी मिळणार असून, भविष्यातील वैद्यकीय सेवा अधिक सक्षम होण्यास हातभार लागणार आहे.शरीररचनाशास्त्र विभागाच्या नियोजनाखाली ही संपूर्ण प्रक्रिया अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडली.

या कार्यात डॉ.स्वाती पांढरे (प्राध्यापक व विभाग प्रमुख, शरीररचनाशास्त्र विभाग), डॉ. विश्वजीत पवार (प्राध्यापक व विभाग प्रमुख, न्यायवैद्यकशास्त्र विभाग), डॉ.सुवर्णा आनंदवाडीकर (सहयोगी प्राध्यापक),डॉ. नितीन भोसले (प्रभारी वैद्यकीय अधीक्षक), डॉ.विवेक कोळगे (सहाय्यक प्राध्यापक, शरीरविकृतीशास्त्र विभाग तथा प्रभारी प्रशासकीय अधिकारी), डॉ.अरबाज ढवळीकर (निवासी वैद्यकीय अधिकारी), अधिसेविका श्रीमती सुमित्रा गोरे, श्री.प्रशांत बनसोडे (प्रयोगशाळा तंत्रज्ञ),वरिष्ठ लिपिक श्री. जीवन गंभीरे तसेच इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता.

संपूर्ण प्रक्रियेसाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.शैलेंद्र चौहान यांनी मार्गदर्शन केले.

त्यांनी देहदान करणाऱ्या गंभीरे कुटुंबीयांचे विशेष आभार मानून,हे कार्य वैद्यकीय विद्यार्थ्यांच्या शिक्षण व प्रशिक्षणासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे नमूद केले.

गंभीरे कुटुंबीयांनी घेतलेल्या या संवेदनशील व समाजहिताच्या निर्णयामुळे सर्वत्र सकारात्मक भावना व्यक्त होत असून,समाजात देहदानाविषयी जागरूकता वाढण्यास निश्चितच मदत होणार आहे.

## आष्टा येथे विजेचा धक्का लागून तरुणाचा जागीच मृत्यू

भूम(प्रतिनिधी)- तालुक्यातील आष्टा येथे सोमवारी (दि. १९) घडलेल्या एका हृदयद्रावक घटनेने संपूर्ण तालुका हादरून गेला आहे. आष्टा येथील तरुण शेतकरी शुभम गपाट याचा विजेचा जोरदार धक्का लागून जागीच मृत्यू झाला.समजलेली माहितीर अशी की, शुभम हा आपल्या आई-वडिलांचा एकुलता एक मुलगा असल्याने गपाट कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून गावात सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. प्राप्त माहितीनुसार, आष्टा शिवारात शेतीसाठीचा विद्युत पुरवठा रात्री ११:४५ ते सकाळी ७:४५ या वेळेत असतो. सोमवारी सकाळी ७:४५ वाजता वीजपुरवठा बंद झाल्यानंतर शुभम हा डी. ओ. (डायरेक्ट ऑन) टाकण्यासाठी विद्युत रोहित्रावर चढला. मात्र, याच वेळी अचानक विद्युत प्रवाह सुरू झाल्याने त्याला जोरदार विजेचा धक्का बसला आणि तो जागीच गतप्राण झाला. या घटनेमुळे अनेक गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. नियोजित वेळेनुसार ७:४५ वाजता वीजपुरवठा बंद असताना रोहित्रामध्ये अचानक विद्युत प्रवाह कसा सुरू झाला? ठरलेल्या वेळेनंतर वीजपुरवठा पुन्हा सुरू होण्यामागे नेमकी कोणती चूक झाली? या अनियोजित व धोकादायक विद्युत पुरवठ्यामुळेच शुभमला आपला जीव गमवावा लागला, अशी संतप्त भावना ग्रामस्थांमधून व्यक्त होत आहे.

तरुण वयात कुटुंबाचा एकमेव आधार असलेला मुलगा काळाच्या पडद्याआड गेल्याने आई-वडिलांचा आक्रोश काळीज पिळवटून टाकणारा आहे. घटनेची माहिती मिळताच आष्टा गावावर शोककळा पसरली असून शुभमच्या घरासमोर नातेवाईक, मित्रपरिवार व ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली. दरम्यान, या प्रकरणी महावितरणच्या हलगर्जीपणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. ही केवळ अपघाती घटना नसून विद्युत यंत्रणेमधील गंभीर त्रुटींमुळे गेलेला एक निष्पाप जीव गेल्याची भावना आहे.

## स्प्रिंकलरचे लोखंडी पाईप नौजल व मोटारीची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- ग्रामीण पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे-सतिश सखाराम मगर, वय ४९ वर्षे, रा. वाघोली ता. जि. धाराशिव यांचे व त्यांचे शेजारील राजेंद्र बळीराम मगर, दत्ता रामचंद्र मगर यांचे वाघोली शिवारातील शेतातील स्प्रिंकलरचे लोखंडी पाईप नौजल व ७.५ सीआरआय कंपनीची मोटार एकुण ३५,००० किंमतीच सदरील वस्तू अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी सतिश मगर यांनी दि.१९.०१.२०२६रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव ग्रामीण पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## नितीन नबीन यांच्यावर मोठी जबाबदारी

भाजपाच्या राष्ट्रीय कार्यकारणींने तरूण युवकाच्या हाती राष्ट्रीय अध्यक्षपद दिले आहे. त्यांचे नाव नितीन नबीन आहे. भाजपाच्या दिल्ली येथील कार्यालयात पदभार देण्यात आला, त्यावेळी पंतप्रधान यांनी आामचे बॉस नितीन नबीन आहे असा उल्लेख केला. बिहारमध्ये भरघोष यश मिळाल्यानंतर भाजपाने त्याच वेळी बिहारचे किंग्जमेकर नितीन नबीन यांना हेरले होते. त्याचे कार्यशैली व संघटन कौशल्य पाहाता त्यांच्या हाती राष्ट्रीय अध्यक्षपदाची सुत्रे सोपावली आहेत. नितीन नबीन हे सर्वात तरूण भाजपाचे राष्ट्रीयअध्यक्ष लाभले आहेत. यापुर्वी सर्वाधिक वयाने अधिक असणारेच अध्यक्ष लाभले होते. भाजपाने हा मोठा निर्णय घेवून आगामी प.बंगालमधील निवडणुका व तामिळनाडू जिंकण्याचा जो प्रयत्न केला आहे याला यश येण्याची शक्यता आहे. पं. बंगालमध्ये ममता राज असून तेथील जनता कंठाळली आहे. सर्वात मोठा प्रश्न हा घुसखोरीचा आहे. बांगला देशातून व अन्य देशातून घुसखोरी झाली. घुसखोर हे भारतीय रहिवासी असल्याचे प्रमाणपत्र मिळवित आहेत. एकतर भारतात सर्वात मोठा कलंक हा भ्रष्टाचाराचा आहे. भ्रष्ट मार्गाने सर्वप्रथम हजार-दोनहजार रूपये देवुन आधारकार्ड काढले जातात. याला गावप्रमुखांनी संमती दिली की आधारकार्ड मिळते. स्थानिक तेवढाच आपला मतदार वाढला म्हणून सामावून घेतले जाते ही वस्तूस्थिती आहे. आधारकार्ड, रहिवासी प्रमाणपत्र नंतर मोफत रेशनचा लाभ उचलतो. त्यापेक्षाही भयानक म्हणजे जन्मनोंद गैरमार्गाने मिळविलेली असते. देशात भ्रष्टाचार करणाऱ्यास मोठी शिक्षा नाही. त्यापेक्षा भयाण बाब खोटे बोलणाऱ्यास कांहीच होत नाही. एकीकडे संविधान श्रेष्ठ मानायाचे तर दुसरीकडे आम्ही कायदे बदलू असे म्हणायाचे. जे काम संसदेत होते ते संसदेबाहेर कसे होणार? जनतेला घुमराह केले जात आहे. त्यांना काय खरे काय खोटे हे कळून येत नाही. आता राज्यात जगजाहिर जाहिरनामे प्रसिद्ध झाले. त्यात लिखित पुस्तीका काढली जाते. दरवर्षी सर्वच राजकिय पक्ष आश्वासने देतात. जाहिरनामा किंवा वचननामा म्हणा तो तंतोतंत पाळला जातो का? अशा लबाडीवर कायदेशीर कारवाई करता येते का? किंवा होते का? देशात लबाड बोलणाऱ्यास काहीच होत नाही म्हणून थापाडी मंडळी मोठ्या प्रमाणात दिसून येते. त्यांचे काहीच वाकडे जनता करू शकत नाही. असा आपला देश आहे. वाईट यासाठी वाटते, नुकत्याच पार पडलेल्या महानगरपालिकेच्या निवडणुकीत दररोज भेटणारे जे निवडूण आले त्यांनी साधे पुन्हा तोंड दाखविले नाहीत. ही वस्तूस्थिती आहे. याला हालक्यात घेवू नये. अतिषय वाईट बाब आहे. देशात चुकीच्या मार्गाने चालणारे व इतरांना बेकूफ बनविणारे अधिक आहेत. कितीजन घटनेनुसार चालतात? विचार करा सर्वश्रेष्ठ घटना असताना त्यानुसार वागत नाहीत. खोटे बोलण्यावर व खोटी कागदपत्रे जन्मदाखले करून फसविणाऱ्यास शिक्षा होते नाही. त्यामुळे भारतात जे चालले आहे हे दादा कोंडके सारखे दुहेरी अर्थानुसार चालताना दिसून येत आहे. हे लोकशाहीत घातक आहे. लोकशाही केवळ भारतात आहे. वेळीच सावध झालो नाही तर मोठे संकट निर्माण होणार आहे. चुकीने मार्गक्रमण होत आहे. अनेक प्रांतात घुसखोरी मोठ्या प्रमाणात झाली आहे. चुकीचे लोक भारतीय सवलतीचा लाभ घेत आहेत. ज्या समाजाला सवलती आहेत त्या समाजात घुसण्याचा मोठा प्रयत्न चालू आहे. त्यामुळे योग्य व्यक्तीला योग्य लाभ मिळत नाही यापुढे तर काही बाबी अशक्य होण्याची शक्यता आहे. त्यामुळे देशात मजबुत व्यक्तीची गरज आहे. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबिन यांच्यावर मोठी जबाबदारी आहे. पक्षाध्यक्ष म्हणून देशातील अनेक राज्यात चांगले कामे करून घेवू शकतात. तामीळनाडू, प.बंगाल, केरळ आदि राज्यातील विधानसभा निवडणुका होणार आहेत. या राज्यात घुसखोरी जनसंख्या अधिक झालेली आहे. भाजपाविरोधात जनमत तयार केले जात आहे. स्थानिकापेक्षा घुसखोरांना कोणत्याही परिस्थिती भाजपाचे सरकार नको आहे. त्यामुळे आगामी राज्यातील विधानसभेच्या निवडणुका भाजपासाठी मोठे आव्हान आहे. त्याला नितीन नबिन कसे समोरे जातील हे पाहाणे औचित्याचे आहे. नितीन नबिन तरूण आहेत. त्यांच्या समाजाचे व ज्या संस्कृतित वाढलेली मंडळी प. बंगाल व तामिळनाडूत दिसून येतात. त्यांचा समाज मोठा आहे तरी आव्हान तगडे आहे हे लक्षात घेतले पाहिजे. मुळात घुसखोरांना हाकलणे आवघड काम आहे. दोघे घुसखोरांची घरे पंधराव्यक्तीने सामावली आहेत. मोठ्या प्रमाणता लोकसंख्या घुसखोरांची आहे. अशा स्थितीत नवीन राष्ट्रीय अध्यक्ष पक्ष प्रमुख प्रमुख म्हणून कसा मार्ग काढतील. हे काम काँग्रेसवाले करतील असे वाटत नाही. त्यामुळे ज्या राज्यात आगामी काळात विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. त्या राज्यातील परिस्थिती अगोदरच कठिण आहे. त्यामुळे नुतन राष्ट्रीय अध्यक्षावर सर्वच जबाबदारी टाकणे योग्य नाही. देशाची सुरक्षा किंवा देशातील जटील प्रश्नाची सोडवणुक सर्वांनी मिळून केली पाहिजे. समस्या सोडविणे तसे आवघड नाही. जे घुसघोर आहेत. त्यांची कुटुंबनियोजनाची शस्त्रक्रिया केली तर? तसे धाडस कोण करणार? देशात समस्या मोठी व कठिण आहेत. भारतात सत्तरवर्षात बऱ्याच चुका झाल्या आहेत. त्या सोडविण्यासाठी बराच काळ लागेल. याला जनतेची साथ आवश्यक आहे. जनतेचे बळ हवे आहे तरच सरकार काही परिवर्तन घडवू शकेल. एकटे पंतप्रधान असो किंवा नवे राष्ट्रीय अध्यक्ष असोत त्याना कडवी मेहनत घ्यावी लागणार आहे. देश आतून पोखरला जात आहे. त्यामुळे प्रत्येक भारतीयांनी विचार गांर्भीयाने केला पाहिजे. ज्यांना आपण आपले काही कारणास्तव आपले मानत नाही त्यांना त्यांना सुद्धा समावून घेतले पाहिजे. त्यांनी सुद्धा सामाविले पाहिजे. दुसरा मार्ग नाही. विचार केला तर एकमेकाशिवाय दुसरा पर्याय नाही. मार्ग सापडेल असे दिसून येत नाही. देश मोठा आहे. चुकीच्या बाबीमुळे किंवा चुकीच्या संदेशामुळे चुकीच्या बाबी घडल्या किंवा घडत असतील तर त्याच अभ्यास नुतन राष्ट्रीय अध्यक्षाने केला पाहिजे. राष्ट्रीय एकात्मेस तडा न जावू देता जटील प्रश्नाची सोडवणुक करावी लागणार आहे. काम कठिण आहे मात्र योग्य, राष्ट्रीय विचाराचे आहे. यात धाडस केले पाहिजे. इतरांनी मोठी साथ दिली पाहिजे.

# हिंद दी चादर गुरु तेग बहादुर यांचा ३५० वा शहीदी समागम

## ऐतिहासीक 'जफरनामा'ची हस्तलिखित प्रत छत्रपती संभाजीनगर येथील भाई दयासिंग, भाई धरमसिंग गुरुद्वाऱ्यात संग्रहित

छत्रपती संभाजीनगर, दि.२०(जिमाका)- सामाजिक एकोपा, धर्म रक्षणासाठी शहादत देणाऱ्या गुरु तेग बहादुरांना हिंद दी चादर अशी पदवी आहे. त्यांचे जीवन हे समाजाच्या रक्षणासाठी वाहिले. तत्कालीन शास्त्यांकडून समाजावर होत असलेल्या अन्यायपूर्ण वागणुकीचा सामोपचार ज्या पत्राने झाला ते पत्र 'जफरनामा' म्हणून इतिहासात प्रसिद्ध आहे. हाच जफरनामा तत्कालिन मुगल बादशाह औरंगजेब यांच्याकडे देण्यासाठी म्हणून छत्रपती संभाजीनगर या शहरात आणला गेला होता. आजही त्याची हस्तलिखित प्रत येथील भाई दयासिंग, भाई हरिसिंग गुरुद्वाऱ्यात संग्रहित आहे.

एक प्रकारे मानव मुक्तीचा जाहीरनामा असलेला हा जफर नामा म्हणजे गुरु तेग बहादुर साहेब यांचे सुपूत्र गुरु गोविंद सिंग यांनी मुगल बादशाह औरंगजेबाला लिहिलेले एक पत्र होय.



नांदेड येथे येत्या २४ व २५ जानेवारी रोजी होऊ घातलेल्या हिंद दी चादर गुरु तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमाचे आयोजन होत आहे. देश विदेशातील भाविक याठिकाणी येणार आहे. त्याअनुषंगाने गुरु तेग बहादुर यांच्या कार्याला उजाळा दिला जात आहे.

याबाबत भाई दयासिंग, भाई हरिसिंग गुरुद्वाराचे सदस्य सरदार हरिसिंग यांनी माहिती दिली. त्यानुसार, 'जफर नामा' म्हणजे विजयाचे पत्र. मुगल बादशाह औरंगजेब याने शिखांवर अनन्वित अत्याचार केले. त्याविरोधात हे एक प्राणांतिक आंदोलन होते. जिझिया करा द्वारे अन्य धर्मियांचे कर रुपात शोषण होत होते. त्यास प्रतिकार करणाऱ्यांना प्राणांची आहुती द्यावी लागे. त्यासाठी गुरु तेग बहादुर यांनी आपल्या शिष्यांसह शहादत दिली. तो एक मोठा रोमांचक इतिहास आहे. शिखांची बलिदानाची परंपरा अधोरेखित करणारी ही घटना होय.



त्याच गुरु तेग बहादुर यांचे पुत्र गुरु गोविंदसिंह यांनी याबाबत औरंगजेबाला पत्र लिहिले. हे पत्र जफरनामा म्हणून प्रसिद्ध आहे. या पत्राचे महत्त्व खूप आहे. हेच ते पत्र जे औरंगजेबाच्या कृत्यांची श्वेत पत्रिका म्हणूनही ओळखले जाते. हे पत्र वाचून औरंगजेबाला आपल्या कृत्याचा पश्चाताप झाला. त्याचे हृदय परिवर्तन झाले. त्यानंतर त्याने अन्याय अत्याचाराला चालना देणारे कायदे रद्द करण्याचे फर्मान जारी केले. या शिवाय गुरु गोविंदसिंगांना पकडण्याचा कुणीही प्रयत्न करु नये. त्यांना त्रास देऊ नये त्यांना सहाय्य करावे, असेही हुकूम जारी केले. इतकेच नव्हे तर त्याने गुरु गोविंदसिंग यांना भेटण्याची इच्छाही व्यक्त केली. मात्र ही त्याची इच्छा काही पूर्ण होऊ शकली नाही. कारण ही घटना इ.स. १७०७ मधिल आहे. हेच वर्ष औरंगजेबाच्या आयुष्याचे शेवटचे वर्ष ठरले.

जफरनामा आणि छत्रपती संभाजीनगरचे अत्यंत महत्त्वाचा संबंध आहे. हे पत्र गुरु गोविंदसिंगांनी लिहिल्यानंतर ते औरंगजेब पर्यंत पोहोचवायचे होते. त्यावेळी औरंगजेब मराठा साम्राज्याचा बिमोड करण्याच्या इच्छेने महाराष्ट्रात तळ ठोकून बसला होता. गुरु गोविंद सिंग यांचे दोन शिष्य भाई दयासिंग आणि भाई धरमसिंग हे पत्र घेऊन औरंगजेबाचे दक्षिणेतील महत्त्वाचे शहर म्हणून छत्रपती संभाजीनगरला (त्यावेळचे औरंगाबाद) आले. येथे येऊन त्यांनी मुगल बादशाहच्या भेटीचा प्रयत्न केला. नेमका त्यावेळी औरंगजेब बादशाह अहिल्यानगर (त्यावेळचे अहमदनगर) मुक्कामी होता. या दोघां शिष्यांनी इथूनच अहमदनगरकडे कूच केले. औरंगजेबाला भेटून आपल्या गुरुंचे पत्र सुपूर्द केले.

फार्सी भाषेत व लिपीत हे पत्र छंदबद्ध काव्य पद्धतीने लिहिले आहे. त्यात शिखांवर झालेल्या अन्याय, अत्याचाराचे वर्णन आहे आणि काहीही झाले तरी आम्ही अन्याय सहन करणार नाही असा निर्धारही आहे.एखाद्या संताने राज्यकर्त्याला खडे बोल सुनावले आहेत. हे पत्र अर्थात जफरनामा औरंगजेबाने वाचला. वाचून त्याला केलेल्या कृत्याचा पश्चाताप झाला. आपल्या आयुष्याच्या अखेरीची चाहूल त्याला लागली होती. त्याने तात्काळ फर्मान जारी करुन सर्व अत्याचार थांबविण्याचे आदेश दिले.

हे पत्र शीख धर्माच्या पवित्र अशा दशमग्रंथ या ग्रंथात समाविष्ट करण्यात आले आहे. आजही छत्रपती संभाजीनगरच्या धावणी मोहल्ला, शहागंज येथील भाई दयासिंग, भाई धरमसिंग या गुरुद्वाऱ्यात संग्रहित ठेवण्यात आले आहे. हे पत्र आजही पाहता येते. विशेष म्हणजे हाच गुरुद्वारा दक्षिण भारतातील पहिला गुरुद्वारा मानला जातो. देशभरातील भाविक येथे माथा टेकण्यासाठी आवर्जून येतात, अशी माहिती या गुरुद्वाराचे सदस्य सरदार हरिसिंग यांनी दिली.

# 'स्क्रोलिंग' थांबलं, इतिहास जागा झाला !

## गाणं, डॉक्युमेंटरी आणि डिजिटल युगातील संस्कार क्रांती

सध्याच्या 'फास्ट फूड', 'इन्स्टा रिल्स'च्या युगात एखादा ट्रेंड किती काळ टिकतो ? फार तर २४ तास! पण, याच डिजिटल जगात ४०० वर्षे जुन्या इतिहासाने आजच्या 'जनरेशन झी'ला (Gen Z) चक्क थांबायला भाग पाडले. निमित्त, सुप्रसिद्ध सुफी गायक डॉ. सतींदर सरताज यांच्या आवाजातील 'हिंद की चादर' या कलाकृतीचे.

नांदेडच्या पवित्र मातीत श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांचा ३५० व्या भव्य शहीदी समागम वर्षानिमित्त कार्यक्रम होत आहे. महाराष्ट्र शासन आणि श्री गुरू तेग बहादूरजी यांच्या ३५० व्या शहीदी शताब्दी समितीच्या सहकार्याने निर्वैर निर्मित 'हिंद की चादर' डॉक्युमेंटरी (माहितीपट), अन् सरताज यांचे गीत आता केवळ व्हायरल कंटेंट उरला नसून, ती एक 'संस्कारांची डिजिटल चळवळ' बनली आहे.

### सुरांचा जादूगर : कोण आहेत सतींदर सरताज ?

या चळवळीचा चेहरा आणि आवाज आहेत, डॉ. सतींदर सरताज. मूळचे पंजाबचे. सरताज केवळ गायक नाहीत, तर सुफी संगीतातील 'डॉक्टरेट' (Ph.D) आहेत. त्यांच्या गळ्यातून जेव्हा सीस लेकर उसी ओर चल दिए... हे शब्द उमटतात, तेव्हा त्यात केवळ संगीत नसते, तर १७ व्या शतकातील वेदना आणि त्यागाचा हुंकार असतो. त्यांच्या याच भारदस्त आवाजामुळे तरुणाई पॉप गाणी सोडून इतिहासाकडे वळली आहे.

### व्हायरल 'सत्य': अल्गोरिदमलाही फुटल्या भावना!

आकडेवारीवर नजर टाकली तर थक्क व्हायला होते. २५ ऑक्टोबर २०२५ ला प्रदर्शित झालेल्या 'हिंद की चादर' या गाण्याने युट्युबवर अल्पावधीतच २.७६ कोटी (2.76 Crore+) व्ह्यूजचा टप्पा ओलांडला आहे. तर १.८३ लाखांहून अधिक लाईक्स असे सिद्ध करतात, की हे गीत लोकांनी फक्त ऐकले नाही, तर अनुभवले आहे.

केवळ युट्युबच नाही, तर इन्स्टाग्रामवरही (Instagram) या गाण्याची लाट आली आहे. विशेषतः सीस लेकर उसी ओर चल दिए या ओळींवर तरुणाईने बनवलेले हजारो 'रिल्स' (Reels) सध्या सोशल मीडियावर इमोशनल ट्रेंड बनले आहेत. दुसरीकडे, निर्वैर प्रॉडक्शन (Nirvair Productions) निर्मित १६ मिनिटांच्या डॉक्युमेंटरीला मिळालेले ४६ लाख (46 Lakhs+) व्ह्यूज हे सांगण्यासाठी पुरेसे आहेत की, चांगल्या कंटेंटला 'अल्गोरिदम'ची गरज नसते, त्याला 'भावनांचा' आधार असतो.

### पुस्तकातील धडा 'मोठ्या पडद्यावर'

शाळांमध्ये इतिहास शिकवला जातो, पण तो पडद्यावर 'दाखवला' तर ? महाराष्ट्र शासनाने नेमका हाच धागा पकडला आहे. शाळा, महाविद्यालयांमध्ये एक आगळावेगळा राबवत श्री गुरु तेग बहादुर साहिब जी (गुरूजी) यांच्या जीवन,शिक्षण आणि सर्वोच्च बलिदानावर आधारित माहितीपट दाखवण्यात येत आहे. या माहितीपटात VFX आणि निमेशनचा वापर करून जुन्या काळातील 'सेपिया' आणि 'गोल्डन' टोन उभा केला आहे.




राज्यातील शाळांमधून गुरुजींचा इतिहास विद्यार्थी मोठ्या पडद्यावर पाहत आहेत. या इतिहासातून ते प्रेरणा घेत आहेत. इतिहास समजून घेत आहेत. जेव्हा विद्यार्थी पडद्यावर पाहतात, की गुरुजींच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यासाठी भाई लखी शाह बंजारा चक्क स्वतःचे घर जाळून टाकतात, तेव्हा वर्गातली शांतता खूप काही सांगून जाते. जे संस्कार शंभर व्याख्यानांतून करणे अवघड आहे, ते या माहितीपटातून होण्यास मदत होते.

### महानायकांना सलाम

हा माहितीपट, गीत इतिहास जिवंत करते. अशा महानायकांना सलाम करते. हा सर्व इतिहास पुस्तकातून आता थेट लोकांच्या काळजात कोरल्या जात आहे.

भाई मखखन शाह लबाना : ज्यांनी समुद्राच्या तुफानातून वाचल्यावर 'खऱ्या गुरूंचा' शोध लावला.

भाई लखी शाह बंजारा: दिल्लीच्या चांदनी चौकात मुघलांच्या नाकावर टिच्चून ज्यांनी घरदार जळाले तरी चालेल, पण गुरुजींची शान राहिली पाहिजे, हा बाणा जपला

भाई जैता जी : गुरुजींचे पवित्र शीर (मस्तक) सांभाळून, अतिशय कठीण प्रवासाने आनंदपूर साहिबला आणले व गुरू तेगबहादुर जी यांचे पुत्र गुरू गोविंदसिंह जी यांच्याकडे सुपूर्द केले.

### नांदेड : विश्वासाचे केंद्र

या साऱ्याचा केंद्रबिंदू आहे-नांदेड. गोदावरीच्या काठावर वसलेले शहर. हे केवळ शहर नसून एक मोठे पवित्र तीर्थस्थान आहे. हे पवित्र स्थळ शीख धर्मातील पाच तख्तांपैकी एक आहे. येथे हजूर साहिब गुरूद्वारा, ज्याला तख्त सचखंड श्री हजूर अबचलनगर साहिब म्हणून ओळखले जाते. दहावे गुरू गुरू गोविंद सिंह यांचे अंतिम विश्रांतीस्थान आहे. श्री गुरू गोविंद सिंहांचे वास्तव्य या भूमीस लाभले. त्याचबरोबर गुरू गोविंद सिंहांनी त्यांच्यानंतर पवित्र ग्रंथालाच शाश्वत गुरू म्हणून घोषित केले. शीख धर्माचे अकरावे आणि अंतिम गुरू पवित्र गुरू ग्रंथ साहिब याच ठिकाणी आहेत. त्यामुळे या पवित्र भूमीत होत असलेल्या श्री गुरू तेग बहादूर साहिब जी ३५० शहीदी आणि श्री गोविंद साहिब जी ३५० व्या गुरतागद्दी शताब्दी निमित्ताने आयोजित कार्यक्रमाकडे संपूर्ण जग पाहत आहे.

शाळेतील मुलांच्या प्रभात फेऱ्या असोत किंवा राज्यातील सिनेमागृहात चित्रपटाच्या सुरूवातीला दाखवले जाणारे गुरूंजींच्या जीवनावर आधारित गीत, माहितीपट असो; प्रत्येक ठिकाणाहून गुरूजींचे जीवन, शिकवण आणि त्यांचे सर्वोच्च बलिदान हा संदेश दिला जात आहे. सरताज यांनी गायलेले गीत, गुरूजींवर आधारित माहितीपट ३५० वर्षांपूर्वीच्या प्रेरक इतिहासाचा आजच्या भाषेतला 'दस्तावेज' (Document) आहे. औरंगजेबाच्या तलवारीपेक्षा गुरुजींचा शांततेचा आणि त्यागाचा मार्ग किती शक्तिशाली होता, हे समजून घेण्यासाठी एकदा तरी ही कलाकृती सर्वांनी पाहायलाच हवी !

गुरू तेग बहादुर साहिब जी यांच्या शहीदीला ३५० वर्ष पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने भारतभर मोठ्या प्रमाणात कार्यक्रम होताहेत. परंतु नांदेड येथे होत असलेल्या या कार्यक्रमास विशेष असे महत्त्व आहे. या होत असलेल्या भव्य दिव्य अशा या श्री गुरू तेग बहादूर साहिब जी शहीदी आणि श्री गोविंद साहिबजी ३५० व्या गुरतागद्दी शताब्दी कार्यक्रमास उपस्थित राहून, प्रत्येकाने इतिहासाचे साक्षीदार देखील व्हायलाच हवे.

**पाहायला हवंच :**

गीत (Song) :
https://www.youtube.com/watch?v=Sj3Lwp07KxU

माहितीपट (Documentary)
https://www.youtube.com/watch?v=wškI87w6Nz-t=1s

**-डॉ. श्याम टरके**
**सहायक संचालक (माहिती),**
**विभागीय माहिती कार्यालय,**
**लातूर**

# शासकीय चित्रकला परीक्षेत राजा नारायणलाल लाहोटी विद्यालयाचे यश

**लातूर प्रतिनिधी:** लातूर येथील राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी शासकीय रेखाकला (एलिमेंट्री व इंटरमिजिएट ड्रॉइंग ग्रेड) परीक्षा २०२५ परीक्षेत घवघवीत यश मिळवून शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. या परीक्षेसाठी एकूण १०८ विद्यार्थी सहभागी झाले होते.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कला जोपासणे अत्यंत आवश्यक आहे. शाळेतील कलाशिक्षक यांनी विद्यार्थ्याकडून करून घेतलेली तयारी व अभ्यास यातून विद्यार्थ्याला हे यश मिळाले आहे. असे आपल्या मार्गदर्शनात शाळेच्या प्राचार्यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल शाळेचे प्राचार्य कर्नल श्रीनिवासूलू, चेअरमन श्री आनंद लाहोटी, रजिस्ट्रार श्री प्रवीण शिवणगीकर, माध्यमिक समन्वयक श्री मनोहर कबाडे, प्राथमिक समन्वयक अरुल सेलवी यांनी मुलांचे अभिनंदन व कौतुक केले. विद्यालयाचे कलाशिक्षक श्री हनुमंत थडकर , अमोल देशमुख,श्री प्रशांत शिंदे या शिक्षकांचे विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन लाभले.

# हिंद दी चादर श्री गुरु तेगबहादूरजी यांच्या त्याग व बलिदानाला विद्यार्थ्यांनी सामूहिक गीतातून दिला उजाळा

**सामूहिक गीताच्या माध्यमातून गुरुंच्या त्याग, समर्पण व बलिदानाचा संदेश पोहोचविण्याचे कार्य - जिल्हाधिकारी राहुल कर्डिले**

**नांदेड प्रतिनिधी:** हिंद दी चादर श्री गुरु तेगबहादूरजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमानिमित्त नांदेड शहरातील शालेय विद्यार्थ्यांनी सामूहिक गीताच्या माध्यमातून श्री गुरु तेगबहादूरजी यांच्या धर्मरक्षण, त्याग व बलिदानाला भावपूर्ण उजाळा दिला.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड येथील श्री गुरु गोविंदसिंगजी स्टेडियमवर आयोजित कार्यक्रमात हजारो विद्यार्थ्यांनी हात जोडून नवमे गुरु पैदा हुए गुरु के महल में हे गीत सादर केले. त्यानंतर जो बोले सो निहाल, सत श्री अकाल, हिंद दी चादर श्री गुरु तेगबहादूर, भारत माता की जय या घोषणांनी परिसर दणाणून गेला.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी यावेळी मार्गदर्शन करताना म्हणाले, दि. २४ व २५ जानेवारी रोजी नांदेड येथील मोदी मैदानावर आयोजित हिंद दी चादर श्री गुरु तेगबहादूरजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा संदेश या उपक्रमाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर पोहोचविण्यात आला आहे. या माध्यमातून गुरुंचा ऐतिहासिक त्याग, समर्पण व बलिदानाचा संदेश तरुण पिढीपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य होत असल्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सांगितले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केल्याबद्दल त्यांनी सहभागी शालेय विद्यार्थी व शिक्षकांचे विशेष कौतुक केले. तसेच दि. २४ व २५ जानेवारी रोजी आयोजित मुख्य कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहनही त्यांनी केले.

हिंद दी चादर श्री गुरु तेगबहादूरजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमाच्या प्रचार व प्रसाराचा एक भाग म्हणून हा सामूहिक गीत गायन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमास हिंद दी चादर क्षेत्रीय समितीचे सह-अध्यक्ष कैलास खसावत, क्षेत्रीय समितीचे सह-सचिव तथा जागरण समितीचे सदस्य भगवान राठोड, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे कार्यकारी अधिकारी तथा कार्यक्रमाचे शासकीय समन्वयक डॉ.जगदीश सकवान, नोडल अधिकारी विजयकुमार पवार, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) माधव सलगर, शिक्षणाधिकारी (योजना) दिलीप बनसोडे, खालसा आयटीआयचे प्राचार्य गुरुबचन सिंग शिलेदार, जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी सचखंड पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी भारत मातेच्या नकाशाच्या स्वरूपात उभे राहून सामूहिक गीत गायन सादर करत उपस्थितांची मने जिंकली.

या सामूहिक गीत गायन कार्यक्रमात नांदेड शहरातील पिपल्स हायस्कूल, सचखंड पब्लिक स्कूल, खालसा हायस्कूल, खालसा आयटीआय, अशोक हायस्कूल, फेजुल उलूम हायस्कूल, केंब्रिज विद्यालय, महात्मा फुले हायस्कूल, सावित्रीबाई फुले हायस्कूल, राजश्री शाहू हायस्कूल, ऑक्सफर्ड इंग्लिश स्कूल, ज्ञानभारती विद्यामंदिर, नागार्जुना पब्लिक स्कूल, ग्यानमाता विद्याविहार, पिनॅकल इंटरनॅशनल, नारायणा इंटरनॅशनल, पोतदार इंटरनॅशनल, दशमेश ज्योत इंग्लिश स्कूल, युनिव्हर्सल इंग्लिश स्कूल, आंध्र समिती हायस्कूल, नेहरू इंग्लिश स्कूल आदी शाळांतील जवळपास १० हजार विद्यार्थी सहभागी झाले होते.

# गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या हौतात्म्य दिनानिमित्त नांदेडसाठी विशेष रेल्वे गाड्यांची घोषणा

**दिल्ली, मुंबई आणि चंदीगडवरून सुटणार विशेष रेल्वे**

**नांदेड प्रतिनिधी:** 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० शहिदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे २४ आणि २५ जानेवारी २०२६ रोजी विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यासाठी देशभरातून येणाऱ्या भाविकांची आणि प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेता रेल्वे प्रशासनाने 'ट्रेन ऑन डिमांड' अंतर्गत मुंबई, चंदीगड आणि दिल्ली (हजरत निजामुद्दीन) येथून नांदेडसाठी विशेष रेल्वे गाड्या चालवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

### मध्य रेल्वेने प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेनुसार, उत्तर भारतातून येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी

दिल्लीतील हजरत निजामुद्दीन स्थानकावरूनही २३ आणि २४ जानेवारी रोजी दुपारी १२:३० वाजता विशेष गाडी नांदेडसाठी हजरत निजामुद्दीन, पानिपत, आग्रा कॅन्ट, विरांगणा लक्ष्मीबाई झांसी, बिना, भोपाळ, इटारसी, खंडवा, भुसावळ, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, पूर्णा मार्गे दुसऱ्या दिवशी दुपारी १६.२० नांदेडला पोहोचेल.चंदीगड ते नांदेड (गाडी क्र. ०४५२४/०४५२३) आणि हजरत निजामुद्दीन ते नांदेड (गाडी क्र. ०४४९४/०४४९३) या दोन राखीव सुपरफास्ट विशेष गाड्या चालवल्या जाणार आहेत. चंदीगडवरून २३ आणि २४ जानेवारी रोजी सकाळी ०५:४० वाजता सुटणारी गाडी अंबाला, पानिपत, दिल्ली सफदरजंग, आग्रा, विरांगणा लक्ष्मीबाई झाशी , भोपाळ, इटारसी, खंडवा, भुसावळ, जळगाव, मनमाड, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, पूर्णा मार्गे प्रवास करत दुसऱ्या दिवशी दुपारी १३:३० वाजता नांदेडला पोहोचेल.

मुंबई येथून देखील विशेष रेल्वे चालविण्यात येणार आहे. लोकमान्य टिळक टर्मिनस (मुंबई) ते नांदेड दरम्यान गाडी क्र. ०१०४१/०१०४२ ही विशेष रेल्वे २३ आणि २४ जानेवारी रोजी मुंबईहून दुपारी १५:३० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी पहाटे ०४:०० वाजता नांदेडला पोहोचेल. ही गाडी ठाणे, कल्याण, इगतपुरी, नाशिक रोड, मनमाड, औरंगाबाद, जालना आणि परभणी या स्थानकांवर थांबेल. परतीच्या प्रवासासाठी ही गाडी नांदेडवरून २४ आणि २५ जानेवारी रोजी रात्री २३:३० वाजता सुटून दुसऱ्या दिवशी दुपारी १३:४० वाजता मुंबईला पोहोचेल. या गाडीत १८ डब्यांची रचना असून यात स्लीपर, जनरल आणि एसी कोचचा समावेश असेल.

या सर्व गाड्यांच्या नियोजनामुळे पंजाब, हरियाणा, दिल्ली आणि महाराष्ट्रातील विविध भागांतून येणाऱ्या हजारो भाविकांना मोठा दिलासा मिळणार आहे. रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना सोशल डिस्टंसिंग आणि सॅनिटायझेशनसह सर्व आवश्यक नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले असून, गाड्यांच्या सुयोग्य संचालनासाठी संबंधित विभागांना विशेष सूचना देण्यात आल्या आहेत.

# संभ्रम आणि अफवा



मुंबईच्या महापौरपदासाठी आग्रही भूमिका घेत दबाव वाढविणे हा स्थायी समितीसह महत्त्वाच्या समित्या मिळविणे, हे शिंदे यांच्या शिवसेनेचे धोरण असू शकते. वेगळा निर्णय घेऊन आम्ही मतदारांशी प्रतारणा करणार नाही, असे शिंदे यांनी म्हटले आहे.

महापालिका निवडणुकांनंतर आता महापौरांच्या निवडीकडे राज्याचे लक्ष लागले आहे. विशेषतः मुंबईत त्या पदासाठी कोणाला संधी मिळणार, याबद्दल कमालीची उत्सुकता निर्माण झाली आहे. महापौरपदासाठी २२ जानेवारी रोजी सोडत होईल, अशी घोषणा नगरविकास विभागाने केली आहे. सोडतीनंतर आरक्षणाचे चित्र स्पष्ट होईल आणि नंतरच राजकीय घडामोडी आणखी वेगवान होतील. २९ महापालिकांसाठी नुकतेच मतदान झाले. महायुतीमधील भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या घटक पक्षांनी अनेक ठिकाणी एकमेकांविरुद्ध निवडणूक लढविल्याने वातावरण तापले होते. निकालानंतर ते निवळेल, असा कयास होता; मात्र महापौर पद हा सर्वांच्याच प्रतिष्ठेचा प्रश्न असल्याने सत्ताधारी पक्षांचे एकमेकांविरुद्ध डावपेच सुरुच आहेत. या तणावाचा फायदा उठविण्यासाठी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना सज्ज झाल्याचे दिसते. 'शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिव-सेना पक्षाच्या नगरसेवकांना मुंबईत भाजपचा महापौर नको आहे' असे विधान ठाकरे गटाच्या नेत्यांनी केले, त्याचवेळी, 'शिंदे यांना सोबत ठेवायचे की नाही यावर भाजपमध्ये मंथन सुरु आहे', असेही उद्धव गटाकडून सांगितले गेले. ही विधाने परस्परविरोधी आहेत. पण गोंधळ निर्माण करणे, संभ्रम वाढविणे हाच त्यामागील उद्देश स्पष्ट दिसतो. देवाची इच्छा असेल, तर आमचा महापौर होईल, असे सांगत खुद्द उद्धव ठाकरे यांनी तर्कवितर्क लढविण्यास राजकीय विश्लेषकांना संधी दिली. निवडणूक निकालानंतर शिंदे यांनी मुंबईतील आपल्या नगरसेवकांना एका हॉटेलात मुक्कामाला ठेवल्यानंतर नगरसेवक फोडण्याचा 'महाशक्ती'चा प्रयत्न तर नाही ना? याची चर्चा सुरु झाल्याने संशय आणि संभ्रम यामध्ये भर पडली.

**जखमेवर मीठ**

विधानसभा निवडणुकीत महायुतीला दणदणीत बहुमत मिळाल्यावर सरकार स्थापनेचा मार्ग कुठल्याही अडथळ्याशिवाय असेल, ही स्वाभाविक अपेक्षा होती; पण तसे घडले नव्हते. अनेकांना महापालिका निवडणुकीनंतर त्याचे स्मरण होत आहे! शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य असल्याने मुंबईत आपला महापौर असावा, असे एकनाथ शिंदे यांच्या शिवसे-नेला वाटते. मुंबईचे महापौरपद, हे भाजपचे स्वप्न आहे. याचे कारण अर्थातच उद्धव यांच्या शिवसेनेकडून आलेला अनुभव. उद्धव यांचा पक्ष भाजपसोबत असताना मुंबई पालिकेत भाजपची संख्या साधारण समान होती. राज्यातील सत्तेत एकत्र असल्याने तेव्हा भाजपकडून महापौरपदाचा मुद्दा प्रतिष्ठेचा केला गेला नाही. 'मुंबई आमचीच', हे किमान जाहीरपणे सांगण्याची सोय भाजपने त्यावेळी उद्धव यांच्यासाठी ठेवली होती. आता पुल-खालून बरेच पाणी वाहून गेले आहे. मुंबईत भाजपकडे ८९ नगरसेवक आहेत. शिंदे यांच्या नगरसेवकांची संख्या २९ आहे. लढविलेल्या जागा आणि जिंकण्याचे प्रमाण याबाबत विधानसभा निवडणुकीत एकनाथ शिंदे यांनी लक्षणीय कामगिरी बजावली; पण यावेळी मुंबईत त्यांचा 'स्ट्राईक रेट' कमी आहे. १३ लाख २३ हजार २७९ मतांसह उद्धव यांच्या पक्षाला ६५ जागा मिळाल्या, शिंदे यांच्या शिवसेनेला ७ लाख मतांपर्यंत मजल गाठता आली. ठाकरे यांची ताकद जास्त आहे, हे निवडणूक निकालांमधून स्पष्ट झाले असले तरी दोन्ही बंधु एकत्र येऊन देखील बहुमतापासून ते दूर राहिले. काँग्रेसने मनसेची सोबत नको, ही भूमिका घेतली नसती, तर कदाचित आजचे चित्र वेगळे दिसले असते. भाजपचा महापौर येणे उद्धव यांच्यासाठी नामुष्कीचे आणि शिंदे यांच्या शिवसेनेचा महापौर बनणे तर जखमेवर मीठ चोळणारे ठरणार आहे. या दोन्हीशिवाय काही वेगळे घडेल, अशी शक्यता नाही. महापौरपदाच्या निवडीवेळी उद्धव यांचे नगरसेवक अनुपस्थित राहिल्यास भाजपला एकट्याच्या बळावर त्यांचा महापौर निवडून आणता येऊ शकतो, याकडे लक्ष वेधले जात असले तरी ती उद्धव यांच्यासाठी आणखी एक हाराकिरी ठरेल. राज्यातील सत्तासमीकरणांना धक्का लागेल, अशी भूमिका भाजपकडून घेतली जाण्याची शक्यताही नाही! अफवांवर विश्वास नको, हे एकनाथ शिंदे यांचे विधानही त्यादृष्टीने बोलके आहे.

# जेवणात लिंबाचा रस घेण्याचे फायदे काय आहे

काही लोकांना जेवणात लिंबू पिळणे आवडते. ही एक खूप चांगली सवय आहे जी तुमचे आरोग्य राखण्यास मदत करते. चला त्याचे फायदे जाणून घेऊ या.

भारतीय थाळींमध्ये, लोक अनेकदा डाळ, भाज्या किंवा सॅलडवर लिंबू पिळण्याचा आनंद घेतात. लिंबू खाणे केवळ स्वादिष्टच नाही तर आरोग्यासाठी देखील फायदेशीर आहे. लिंबू व्हिटॅमिन सी, फ्लेव्होनॉइड्स आणि अँटीऑक्सिडंट्सचा समृद्ध स्रोत आहे. जेव्हा आपण गरम अन्न किंवा सॅलडमध्ये लिंबू घालतो तेव्हा त्यात असलेले सायट्रिक आम्ल केवळ अन्नाची चव वाढवत नाही तर पोषक तत्वे शोषण्यासाठी आपल्या पचनसंस्थेला देखील तयार करते.

शाकाहारी पदार्थांमध्ये आढळणारे नॉन-हीम आयर्न शरीर सहजपणे शोषू शकत नाही, परंतु लिंबूमधील व्हिटॅमिन सी ते शोषण्यायोग्य बनवते, ज्यामुळे अशक्तपणासारख्या आजारांपासून संरक्षण मिळते. लिंबाचा रस अन्नाचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी करण्यास देखील मदत करतो, रक्तातील साखरेमध्ये अच-ानक वाढ होण्यास प्रतिबंध करतो.

तुमच्या दैनंदिन आहारात लिंबूचा समावेश करणे हा तुमचा चयापचय पुनरुज्जीवित करण्याचा आणि तुमची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्याचा एक स्वस्त आणि प्रभावी मार्ग आहे.

ओमेगा ३ फॅटी ॲसिड या पदार्थातून देखील मिळते, आहारात समाविष्ट करा

लोह शोषण सुधारते

शाकाहारी पदार्थ (पालक आणि डाळ सारखे) लोहाने समृद्ध असतात, परंतु शरीर ते पूर्णपणे शोषून घेत नाही. लिंबूमधील एस्कॉर्बिक ॲसिड (व्हिटॅमिन सी) अन्नातील लोह वापरण्यायोग्य बनवते. जर तुम्ही मसूरवर लिंबू पिळला तर तुम्ही नैसर्गिकरित्या तुमचे हिमोग्लोबिन पातळी वाढवता, ज्यामुळे थकवा आणि अशक्तपणा दूर होण्यास मदत होते.

पाचक प्रणाली चांगली करते आणि एंजाइम्सचे सक्रियकरण करते

लिंबाचा रस पोटात लाळ आणि पाचक रसांचे स्राव उत्तेजित करतो. सायट्रिक आम्ल यकृताला पित्त तयार करण्यास मदत करते, जे चरबी पचवण्यासाठी आवश्यक आहे. जड जेवणात लिंबू घालल्याने पोटफुगी, गॅस आणि अपचन कमी होते. ते डिटॉक्स एजंट म्हणून देखील काम करते, तुमचे आतडे स्वच्छ करते.

वारंवार सर्दी आणि खोकला होतोय? कारणे आणि प्रतिबंधात्मक उपाय जाणून घ्या

रोग प्रतिकारशक्ती आणि वजन व्यवस्थापन करते

लिंबूमधील अँटीऑक्सिडंट्स पेशींना मुक्त रॅडिकल्सच्या नुकसानापासून वाचवतात, ज्यामुळे वृद्धत्व कमी होते. लिंबूमधील पेक्टिन फायबर भूक नियंत्रित करण्यास मदत करते. जेवणासोबत लिंबू खाल्ल्याने इन्सुलिन प्रतिसाद सुधारतो, अतिरिक्त चरबी जमा होण्यापासून रोखतो. ते तुमच्या शरीराची पीएच पातळी संतुलित करते, ती अल्कधर्मी ठेवते.

खबरदारी-लक्षात ठेवा की ते कधीही जास्त उकळत्या अन्नात घालू नका, कारण व्हिटॅमिन सी उष्णतेला संवेदनशील असते आणि ते नष्ट होऊ शकते. उष्णतेपासून काढून टाकल्यानंतर किंवा खाताना नेहमी अन्नावर लिंबाचा रस पिळा. एक लहान लिंबू तुमचे सामान्य जेवण सुपरफूड मध्ये बदलू शकते

अस्वीकरण  या लेखात दिलेली माहिती आणि उपाय सामान्य माहितीवर आधारित आहे. या माहितीची पूर्णता, विश्वासार्हता आणि अचूकता याबाबत **'लातूर समाचार'** कोणतीही हमी देत नाही. अधिक माहितीसाठी संबंधित तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.



# तुमचा स्वादुपिंड निरोगी ठेवण्यासाठी



प्रक्रिया केलेले अन्न, साखर आणि अस्वास्थ्यकर चरबी कमी असलेल्या संतुलित आहारावर लक्ष केंद्रित करा, तर फळे, भाज्या आणि संपूर्ण धान्ये यावर भर द्या; सर्वात महत्त्वाचे म्हणजे, धूम्रपान सोडा, अल्कोहोल मर्यादित करा, हायड्रेटेड रहा, रक्तातील साखरेचे व्यवस्थापन करा, नियमित व्यायाम करा आणि जळजळ आणि आजार टाळण्यासाठी निरोगी वजन राखा.

आहार आणि पोषण

निरोगी खा: तुमची प्लेट फायबरयुक्त फळे, भाज्या (पालक, बेरी, ब्रोकोली), संपूर्ण धान्य आणि पातळ प्रथिने (डाळ, मासे, अंडी) ने भरा.

अस्वास्थ्यकर चरबी मर्यादित करा: लाल मांस, पूर्ण चरबीयुक्त दुग्धजन्य पदार्थ आणि तळलेले पदार्थ यांमधील संतृप्त चरबी कमी करा, कारण ते स्वादुपिंडाला अधिक काम करण्यास भाग पाडतात.

प्रक्रिया केलेले अन्न टाळा: शुद्ध साखर, रासायनिक पदार्थ आणि प्रक्रिया केलेले पदार्थ कमी करा ज्यामुळे जळजळ होऊ शकते.

हायड्रेटेड रहा: पचनक्रियेत एंजाइम उत्पादन आणि विषारी पदार्थ काढून टाकण्यास मदत करण्यासाठी भरपूर पाणी प्या.

जीवनशैलीतील बदल

धूम्रपान सोडा: धूम्रपान केल्याने स्वादुपिंडाच्या समस्यांचा धोका लक्षणीयरीत्या वाढतो, म्हणून सोडणे अत्यंत आवश्यक आहे.

अल्कोहोल मर्यादित करा: अल्कोहोलचे सेवन कमी करा किंवा थांबवा, कारण ते स्वादुपिंडाचा दाह होण्याचे एक प्रमुख कारण आहे.

नियमित व्यायाम करा: वजन नियंत्रित करण्यासाठी आणि पचन सुधारण्यासाठी दररोज ३० मिनिटे कार्डिओ (पोहणे, सायकलिंग) करण्याचा प्रयत्न करा.

वजन नियंत्रित करा: स्वादुपिंडाचा कर्करोग आणि स्वादुपिंडाचा दाह होण्याचा धोका कमी करण्यासाठी निरोगी वजन राखा.

रक्तातील साखर नियंत्रित करा: स्वादुपिंडाचे नुकसान होण्यापासून संरक्षण करण्यासाठी रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवा.

पुरेशी झोप घ्या: स्वादुपिंडासह एकूण आरोग्यासाठी ७-८ तासांची शांत झोप घ्या.

काय पहावे

लक्षणे: सतत पोटदुखी, अस्पष्ट वजन कमी होणे, कावीळ, मळमळ, उलट्या, ताप किंवा जलद हृदयाचे ठोके जाणवत असतील तर त्याकडे लक्ष

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा



**साग**-सागात सर्व प्रकारच्या त्वचे करता लाभदायक न्यूट्रीशन असतात आणि मजेदार गोष्ट म्हणजे तुमचे शरीर त्या सर्व न्यूट्रीशन ला चमत्कारीक स्पंज प्रमाणे शोषुन घेतो. साग जसे की पालक, कोबी, ब्रोकोली आणि हिरवे सफरचंद निश्चितच आपण आपल्या दैनिक आहारात याचा समावेश करायला हवा. डाळींबतुम्ही डाळींब खाता? बरेच जण नाही खात पण त्यांना हे माहीत नाही की डाळींबात बरेचसे अँटीऑक्सीडेंट असतात जे आपल्याला दुस-या फळांमध्ये मिळत नाही. जेव्हा स्वस्थ त्वचेबद्दल आपण बोलतो तेव्हा कदापीही आपल्याला डाळींबाला विसरून चालणार नाही. **(क्रमश.)**

## २ Joke विनोद




बाबू - तुझे वडील किती वर्षाचे आहेत.

राजू - माझ्याच वयाचे आहेत.

बाबू - अरे पण हे कसं शक्य आहे.

राजू - का नाही शक्य? अरे मी जन्मलो, नि ते वडील बनले ना स!

## ३ Message संदेश




Santa's Morning workout
santa 2 doctor-apne kaha tha ki subah khelne se sehat thik rehti hai pr muje to koi fark nai pada?
doctor-konsa game kheltehо?
santa-mobile mai snake wala .

## ४ Thought सुविचार



ज्याला शत्रू नसतात त्याला अनुयायी देखील नसतात.- **डॉन प्याट**

**संस्कृत सुभाषित**

**रसान्तराण्येकरसं यथा दिव्यं पयोऽश्नुते।**
**देशे देशे गुणष्वेव मवस्थास्त्वमविक्रियः।।**

**मराठीत अर्थ**

आकाशातून पृथ्वीवर एकाच प्रकारचे पाणी पडते, पण जमिनीवरील निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळे रस पाण्यात मिसळतात. तसेच निर्गुण आणि निराकार परमेश्वर पृथ्वीवर वेगवेगळ्या अवस्थांत दिसतो.

# महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. खर्चात कपात
६. पुष्कट
९. पोटापुरता शिधा
११. प्रमाणपत्र
१२. विश्रांती
१४. गणगोत
१६. तात्काळ
१८. आपला देश
१९. मोठी चूल
२०. चोरी करणारा
२२. झाडलोट
२४. वाढलेला व्याप
२५. जरतारीचा मोर यावर नाचतो
२७. प्रयत्न
२८. घाव, प्रहार
२९. रोखलेली नजर
३१. संतोष, आनंद
३४. समुद्रकिनारा
३८. पुरुष
३९. शिव! शिव!
४०. नुसतीच भटकंती
४१. विशेष
४२. अत्यंत यातनामय अवस्था
४५. माळ, सर
४६. हात
४८. पर्जन्य
४९. फोडातील द्रव
५०. गप्पांची जागा
५२. वक्र
५३. पूर्ण भेदून जाणारे
५४. शरीर
५५. अरण्य, जंगल
५६. तीव्र, अत्यंत टोकदार
५७. दिवस
५९. अर्धांगवायू
६१. चर्चा
६३. कावळा
६४. थोडेसुद्धा, अल्पप्रमाण
६५. टोळीचा प्रमुख
६७. खिडकी
६९. मच्छर
७१. तातडीचे संदेशवहन करण्याचा नामशेष झालेला प्रकार
७३. हनुमान (ग्रा.)
७५. प्रेम, ममता
७७. हमाल
८१. सूर्याचे एक नाव
८२. ठोक, हाण!
८३. युक्ती
८४. नेता, पुढारी

### उभे शब्द

१. कपडालत्ता
२. टिंगल, टवाळी
३. केव्हा (ग्रा.)
४. शाश्वत, चिरंतन
५. सोन्या-चांदीचा व्यापारी
७. महाशिवरात्रीचा मराठी महिना
८. परस्पर
९. पुन्हा पुन्हा
१०. प्रगती, उन्नत
१२. विमान
१३. कच्चे राहिल्यास निरूपयोगी मृत्तिकापात्र
१५. निवासस्थान
१७. आत-बाहेर करण्याची चौकट
२१. दात
२३. वंशपरंपरागत अधिकार
२६. फळातील द्रव
२७. सामान्य
३०. तापापूर्वीचे शहारे
३२. माणूसकी
३३. धैर्य, हिंमतीचे काम
३५. मगज
३६. कडक, न दबणारे
३७. साहित्यातील नऊ भावना
४१. मीठाची चव
४२. नाकी दम आणणारा आकडा
४३. भरपूर रस असलेला
४४. वेडावाकडा
४५. परिस्थिती
४६. पळसाचा डिंक
४७. जन्म-मृत्यू
४८. मोदकाचे आच्छादान
५०. पत्र
५१. अभिप्राय
५३. नाविकदल
५५. मध्यरात्रीचा पाऊस
५८. विरोध, द्वेष
६०. आठवड्याचा दिवस
६२. चिकटून, जवळ
६६. अति तीव्र, जाळणारे
६८. माफी, दया
७०. दाताखालचा, मदतनीस
७२. महान
७४. कैकयीची दासी
७६. वेदना
७७. वजन
७८. सुंदर तरुणी, पत्नी
७९. शंकर
८०. शेवट

### आडवे उत्तर

१.काटकसर ६.अमाप ९.पसाभार ११.परवाना १२.आराम १४.घरदार १६.तडकाफडकी १८.भारत १९.भट्टी २०.चोर २२.कोवारे २४.पसारा २५.पदर २७.सायास २८.वार २९.टक ३१.समाधान ३४.सागरतट ३८.नर ३९.हरहर ४०.वणवण ४१.खास ४२.नरकवास ४५.हार ४६.कर ४८.पाऊस ४९.लस ५०.टमटमनगरी ५२.वाकडा ५३.आरपार ५४.तन ५५.रान ५६.तीक्ष्ण ५७.वासर ५९.लकवा ६१.मसलत ६३.काक ६४.लवमात्र ६५.सरदार ६७.गवाक्ष ६९.डास ७१.तार ७३.हणमंत ७५.माया ७७.भारवाहक ८१.प्रभाकर ८२.मार ८३.करामत ८४.नायक

### उभे उत्तर

१.कापडचोपड २.टर ३.कवा ४.सनातन ५.सराफ ७.माघ ८.परभारे ९.परतपरत १०.भरभराट १२.आकाशयान १३.मडके १५.दार १७.कीरवा २१.रद २३.वारसाहक्क २६.रस २७.साधारण ३०.कसकस ३२.मानवता ३३.साहस ३५.गर ३६.टणक ३७.नवरस ४१.खारट ४२.नऊ ४३.रस-वान ४४.वाकडातिकडा ४५.हालह-वाल ४६.कमरकस ४७.जननमरण ४८.पारी ५०.टपाल ५१.मत ५३.आरमार ५५.रातवा ५८.सवतासुभा ६०.वार ६२.लगत ६६.दाहक ६८.क्षमा ७०.सहाय्यक ७२.थोर ७४.मंथरा ७६.यातना ७७.भार ७८.वामा ७९.हर ८०.अंत




## थोडक्यात/ संक्षिप्त

### क्रिकेटप्रेमींसाठी मेट्रो प्रशासनाचा मोठा निर्णय; 'इतक्या' वाजेपर्यंत सुरु राहणार

**नागपूर**–भारत आणि न्यूझीलंड क्रिकेट संघात आज विदर्भ क्रिकेट असोसिएशन स्टेडियम, जामठा इथे होणाऱ्या पहिल्या टी–२० क्रिकेट सामन्याच्या पार्श्वभूमीवर क्रिकेट प्रेमी नागरिकांच्या सोयीसाठी महामेट्रो तर्फे मेट्रो ट्रेन सेवा रात्री १० वाजेनंतरही सुरु ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मेट्रो सेवा मध्यरात्री १२ वाजेपर्यंत पर्यंत तसंच आवश्यक असल्यास त्याही पुढे सुरु ठेवण्यासंबंधीचा निर्णय महा मेट्रो प्रशासनाने घेतला आहे.रस्त्यावरील वाहतूक कोंडी कमी होणार : यासंदर्भात काही दिवसांपूर्वी महा मेट्रोचे संचालक (स्ट्रॅटेजिक प्लॅनिंग) अनिल कोकाटे आणि विदर्भ क्रिकेट असोसिएशनचे सचिव संजय बडकस यांच्यात संयुक्त आढावा बैठक पार पडली. या बैठकीत सामन्याच्या दिवशी प्रवाशांचा सुरक्षित, सुलभ आणि जलद प्रवास सुनिश्चित करण्यासाठी विविध उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. त्यात क्रिकेट चाहत्यांच्या सोयीसाठी खापरी मेट्रो स्टेशन ते जामठा स्टेडियम मार्गावर नागपूर महानगरपालिकेच्या बसेस फिडर सेवा म्हणून उपलब्ध असतील.

### विराट कोहली टॉपच्या खुर्चीवरुन आला खाली, इतिहास रचत 'हा' फलंदाज बनला नंबर-वन, रोहित शर्माला मोठा धक्का

दिल्ली–भारतीय क्रिकेट संघाचा स्टार फलंदाज विराट कोहली अवघ्या एका आठवड्यानंतर आयसीसी वनडे क्रमवारी–तील अव्वल स्थानावरून घसरला आहे. न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या वनडेत दमदार फलंदाजी करत कोहलीने नंबर वनची खुर्ची पटकावली होती. मात्र, आता न्यूझीलंडचा धडाकेबाज फलंदाज डॅरिल मिशेलने इतिहास रचत थेट अव्वल स्थाना–वर झेप घेतली. मिचेलने आपल्या वनडे कारकिर्दीतील सर्वो त्तम रेटिंग मिळवली असून तो आयसीसी वनडे क्रमवारीत मोठ्या फरकाने नंबर वन फलंदाज ठरला आहे.
डॅरिल मिशेल आयसीसी वनडे क्रमवारीत नंबर वन फलंदाज भारत विरुद्ध न्यूझीलंड वनडे मालिका संपल्यानंतर आयसीसीने नव्या वनडे क्रमवारीची घोषणा केली. न्यूझीलंडचा स्टार फलंदाज डॅरिल मिशेल आता पहिल्या क्रमांकावर विराजमान झाला आहे. मागील आठवड्यात तो दुसऱ्या स्थानावर होता आणि अवघ्या एका रेटिंग पॉइंटने मागे पडला होता.

### ऑस्ट्रेलियन फलंदाजाने ५१ चेंडूत ठोकले शतक; कांगारुंकडून जपानचा धूव्वा

दिल्ली,२१ जानेवारी (पीएसआय)
ऑस्ट्रेलियाचा डावखुरा फलंदाज विल मालास्झ्झुकनं आयसीसी अंडर–१९ विश्वचषकात इतिहास रचला. अंडर–१९ विश्वचषकात सर्वात जलद शतकाचा विक्रम मालास्झ्झुकनं त्याच्या नावावर केला आहे. त्यानं फक्त ५१ चेंडूत शतक पूर्ण केलं. या शतकामुळं ऑस्ट्रेलियाला विश्वचषकात जपानचा आठ विकेट्सने पराभव करता आला. विलनं ५५ चेंडूत १०२ धावा केल्या, ज्यामुळे २०२ धावांचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाला सहज विजय मि ळाला. यासह ऑस्ट्रेलियाने सुपर सिक्समध्ये स्थान निश्चित केले.ऑस्ट्रेलियाची आक्रमक फलंदाजी : सामन्यात प्रथम फलंदाजी करणाऱ्या जपानने ५० षटकांत आठ विकेट्सच्या मोबदल्यात २०१ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल ऑस्ट्रेलियानं २९.१ षटकांत फक्त दोन विकेट्स गमावून २०४ धावा केल्या आणि सामना जिंकला. विल व्यतिरिक्त, सलामीवीर नितेश सॅम्युअलनेही ऑस्ट्रेलियाकडून दमदार खेळी केली, ७३ चेंडूत ६० धावा करत नाबाद राहिला.

### मुलीचा जीव वाचवण्यासाठी रोहितचा हात पकडला, सिक्युरिटी तोडली, डोळ्यात पाणी आणणारी आईची करुण कहाणी

इंदूर–भारत आणि न्यूझीलंड यांच्यात इंदूरमध्ये झालेल्या तिसऱ्या वनडे मॅचवेळी एक महिला टीम हॉटेलमध्ये शिरली आणि तिने रोहित शर्माचा हात पकडला. रोहित शर्मा हॉटेलमध्ये प्रवेश करत असताना ही घटना घडली आहे. महिला सुरक्षेचं कवच तोडून रोहित शर्माला भेटायला पोहोचली आणि मदत करण्यासाठी विनवणी करू ला–गली. माझ्या मुलीला गंभीर आजार झाला आहे, त्यासाठी ९ कोटी रुपयांच्या इंजेक्शनची गरज आहे, असे महिला म्हणाली आहे.सरिता शर्मा असे या महिलेचे नाव आहे. मुलगी अनिका हिला गंभीर आजार झाला आहे, या आजारासाठी अमेरिकेहून इंजक्शन मागवावं लागणार आहे, ज्याची किंमत ९ कोटी रुपये आहे. आतापर्यंत मी थोडे थोडे करून ४.१ कोटी रुपये जमा केले आहेत, पण वेळ निघून चालली आहे. मला क्रिकेटपटूंकडून मदतीची अपेक्षा आहे.

# नागपुरात 'भारताच्या वाघांची' डरकाळी!

## किवींचा धुव्वा उडवत टीम इंडियाचा दमदार विजय

### मालिकेत 1-0ने आघाडी

**नागपूर:** भारत आणि न्यूझीलंड या दोन्ही संघांमध्ये सुरू असलेल्या ३ टी–२० सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना नागपूरच्या विदर्भ क्रिकेट असोसिएशनच्या मैदानावर पार पडला. या सामन्यात न्यूझीलंडने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या भारतीय संघाकडून अभिषेक शर्माने सुरूवातीला आणि शेवटी रिंकू सिंगने दमदार फलंदाजी करून २३८ धावांचा डोंगर उभारण्यात मोलाची भूमिका बजावली. या धावांचा पाठलाग करताना ग्लेन फिलिप्स आणि मार्क चॅपमन यांनी पूर्ण जोर लावला. पण शेवटी भारतीय संघाने हा सामना ४८ धावांनी जिंकून मालिकेत १–० ने आघाडी घेतली आहे.
भारतीय संघाने दिलेल्या धावांचा पाठलाग करताना न्यूझीलंडला सुरूवातीलाच मोठा धक्का बसला. डेव्हॉन कॉन्वे शून्यावर माघारी परतला. त्यानंतर रचिन रवींद्रनेही १ धाव करून पॅव्हेलियनची वाट धरली. सलामीला आलेल्या टीम रॉबिन्सनने १५ चेंडूत २१ धावा करून


भारत आणि न्यूझीलंड यांच्यात झालेल्या पहिल्या टी –२० सामन्यात भारतीय संघाने दमदार विजय मिळवून मालिकेत १–० ने आघाडी घेतली आहे.

संघाचा डाव सांभाळण्याचा प्रयत्न केला. पण तो देखील बाद होऊन माघारी परतला. त्यानंतर ग्लेन फिलिप्स आणि मार्क चॅपमनने तुफान फटकेबाजी करून न्यूझीलंडला सामन्यात पुनरागमन करून दिलं. ग्लेन फिलिप्सने ४० चेंडूत ७८ धावांची तुफानी खेळी केली. या खेळीदरम्यान त्याने ४ चौकार आणि ६ षटकार खेचले. तर चॅपमनने २४ चेंडूत ३९ धावा केल्या. ही जोडी मैदानावर होती, तोपर्यंत न्यूझीलंडचा संघ सामन्यात टिकून होता, पण ही जोडी फुटल्यानंतर भारतीय गोलंदाजांनी सामन्यावरील पकड मजबूत केली.

**भारतीय संघाने उभारला २३८ धावांचा डोंगर**
या सामन्यात न्यूझीलंडने नाणेफेक जिंकून भारतीय संघाला प्रथम फलंदाजी करण्याचं आमंत्रण दिलं होतं. प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाला सुरूवातीलाच २ मोठे धक्के बसले. संजू सॅमसन आणि इशान किशन दोघेही स्वस्तात माघारी परतले. त्यानंतर अभिषेक शर्माने तुफान फटकेबाजी करून भारतीय संघाचा डाव सांभाळला. अभिषेक शर्माने ३५ चेंडूंचा सामना करत ५ चौकार आणि ८ षटकारांच्या साहाय्याने ८४ धावांची दमदार खेळी केली. कर्णधार सूर्यकुमार यादवने २२ चेंडूत ३२ धावांची खेळी केली. तर हार्दिक पंड्याने १६ चेंडूत २५ धावा केल्या. शेवटी रिंकू सिंगने तडाखेबंद फलंदाजी केली. त्याने ४ चौकार आणि ३ षटकारांच्या साहाय्याने २० चेंडूत नाबाद ४४ धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर भारतीय संघाने ७ गडी बाद २३८ धावांचा डोंगर उभारला.

## वर्ल्डकप संघातून वगळले, तरी शुबमन गिल होणार टी–२० संघाचा कर्णधार?

दिल्ली–भारताचा युवा स्टार फलंदाज शुबमन गिल हा भारतीय वनडे आणि कसोटी संघाचा कर्णधार आहे. रोहित शर्माने कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केल्यानंतर ही जबाबदारी गिलकडे सोपवण्यात आली आहे. तर रोहितनंतर वनडे संघाची जबाबदारी देखील गिलकडे सोपवण्यात आली आहे. येत्या काही दिवसात सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली खेळणारा भारतीय संघ टी–२० वर्ल्डकप स्पर्धा खेळण्यासाठी मैदानात उतरणार आहे. या संघात शुबमन गिलला स्थान देण्यात आलेलं नाही. पण ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार म ायकल क्लार्कच्या मते, आयसीसी टी–२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धा झाल्यानंतर शुबमन गिल भारतीय संघात पुनरागमन करू शकतो आणि त्याच्याकडे नेतृत्वाची जबाबदारी सोपवली जाऊ शकते. आयसीसी टी–२० वर्ल्डकप स्पर्धेसाठी शुबमन गिलला भारतीय संघात स्थान मिळण्यासाठी प्रबळ दावेदार मानलं जात होतं. कारण तो वनडे आणि कसोटी संघाचा कर्णधार आहे आणि टी–२० संघात डावाची सुरूवात देखील करायचा. पण त्याची सुमार कामगिरी पाहता त्याला बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला.
या निर्णयामुळे अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला. मायकल क्लार्कने गिलला टी–२० संघातून वगळण्यावर आपली प्रतिक्रिया दिली आहे. क्लार्कच्या मते, बीसीसीआय आणि टीम मॅनेजम ेंटला आगामी टी–२० वर्ल्डकप जिंकायचा आहे, त्यामुळेच अजीत आगरकरांनी हा निर्णय घेतला आहे.

## विराट कोहली व रोहित शर्मा निवृत्तीनंतरही मैदानात, नागपूरमधील टी–२० सामन्यात

नागपूर–विराट कोहली आणि रोहित शर्मा या दोघांनी मिळून भारतासाठी टी–२० क्रिकेटमध्ये अनेक संस्मरणीय विजय घडवले, विश्वचषकातील अनेक विक्रम रचले आणि भारतीय फलंदाजीला जागतिक स्तरावर नवी उंची दिली. टी–२० सामन्यांम ध्ये कोहली आणि रोहित यांची फलंदाजी बघण्यासाठी क्रिकेटचे चाहते आतुर राहतात. नागपूरमध्ये भारत विरुद्ध न्यूझीलँड संघादरम्यान पहिला टी–२० सामना २१ जानेवारी रोजी खेळविला जात आहे. कर्णधार सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वात भारतीय संघ टी–२० विश्वचषकापूर्वीच्या मालिकेची विजयी सुरूवात करण्यासाठी सज्ज झाला आहे. या सामन्यात विराट कोहली आणि रोहित शर्मा खेळत नसले तरी त्यांची अप्रत्यक्ष उपस्थिती स्टेडियमम ध्ये बघायला मिळत आहे.
निवृत्तीनंतरही मैदानात कसे?



विराट कोहलीने १२ जून २०१० रोजी झिम्बाब्वेविरुद्ध हरारे येथे आपला पहिला टी–२० आंतरराष्ट्रीय सामना खेळला. सुरुवातीला तंत्रशुद्ध फलंदाज म्हणून ओळख निर्माण करणाऱ्या कोहलीने पुढे टी–२० फॉरमॅटमध्ये सातत्य, दबावाखाली धावा काढण्याची क्षमता आणि मोठ्या सामन्यांतील कामगिरी यांमुळे वेगळी ओळख निर्माण केली. त्याने १२५ टी–२० आंतरराष्ट्रीय सामन्यांत ४,१८८ धावा केल्या असून त्यात १ शतक व ३८ अर्धशतके आहेत. टी–२० विश्वचषक २०१४ मध्ये सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरलेला कोहली २०१६ च्या विश्वचषकातही 'प्लेअर ऑफ द टूर्नामेंट' ठरला. २०२४ च्या अंतिम सामन्यात त्याने ७६ धावांची संयमी पण निर्णायक खेळी साकारत 'मॅन ऑफ द मॅच' पुरस्कार मिळवला आणि त्यानंतर ''टी–२० आंतरराष्ट्रीयसाठी ही माझी शेवटची खेळी आहे,'' अशी भावनिक घोषणा केली. दुसरीकडे, रोहित शर्माने १९ सप्टेंबर २००७ रोजी इंग्लंडविरुद्ध डरबन येथे झालेल्या उद्घाटन टी–२० विश्वचषकात आपला पहिला आंतरराष्ट्रीय टी–२० सामना खेळला. कारकीर्दीच्या सुरुवातीप–ासूनच निर्भय फलंदाजी ही त्याची ओळख राहिली. 'हिटमॅन' म्हणून प्रसिद्ध असलेल्या रोहितच्या नावावर टी–२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील सर्वाधिक पाच शतकांचा विक्रम आहे.

## खेळांत चलता है, याच मानसिकतेमुळे पदकांची वानवा – हायकोर्ट

**मुंबई**–आईस हॉकीच्या बाबतीत राज्य सरकापीएसआय)रसह राष्ट्रीय संघटनेच्या एकंदरीत भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त करत मुंबई हायकोर्टानं क्रीडा खात्यांची बुधवारी (२१ जानेवारी) चांगलीच खरडपट्टी काढली. जर तुमच्याकडे आईस हॉकीचं रिंकच उपलब्ध नाही आहे, तर तो खेळ खेळताच कशाला?, करदात्यांचा पैसा आणखीन फुकट घालवू नका. तुमच्या याच नाकर्तेपणामुळं देशाला पदकं मिळत नाहीत, अशा शब्दांत कानउघडणी करत मुंबई हायकोर्टानं आईस हॉकी असोसिएशन ऑफ म हाराष्ट्राच्यावतीनं दाखल याचिका फेटाळून लावत राज्याच्या संघ निवडीवर लावलेली स्थगिती कायम ठेवलीय. हायकोर्टाच्या या निर्णयामुळं लेह–लड्डाखला विंटर गेम्सकरता गेलेल्या टीमवर एकही सामना न खेळता परत येण्याची नामुष्की ओढावलीय.
हायकोर्टाकडून तीव्र शब्दात कानउघडणी : ज्या खेळाचं तुमच्याकडे मैदानच उपलब्ध नाही, तो खेळ खेळताच कशाला?, नको तिथं करदात्यांचा पैसा वाया घालवण्याऐवजी जे खेळ अस्तित्त्वात आहेत. त्यांच्याकडे लक्ष द्या. तुमच्या याच 'चलता है' मानसिकतेमुळं आज देशात ऑलिम्पिक पदकांची वानवा आहे. क्रिकेटमध्ये टेनिस बॉलनं सराव करवून संघाला लेदर बॉलच्या सामन्यात खेळवता येईल का?, तसंच रोलर स्केट्सवर खेळवून तुम्ही आईस हॉकी संघाची निवड कशी करू शकता?, हा वेळेचा आणि करदात्यांच्या पैशाचा अपव्यय नाही का?, अशानं ते खेळाडू काय शिकणार? तसंच राष्ट्रीय संघटनेकडे जर देशातील एकमेव आईस हॉकी रिंक देहरादूनमध्ये उपलब्ध आहे, तर मग ही संघटना खेळाचा विकास आणि प्रचार करण्यासाठी काय करते?, फक्त सेमिनार घेऊन खेळ मोठा होणार आहे का?, अशा तीव्र शब्दांत हायकोर्टानं बुधवारी (२१ जानेवारी) क्रीडा प्रशासनाची खरडपट्टी काढली. आगामी खेलो इंडिया विंटर गेम्समधील आईस हॉकीकरता सुरू असलेल्या राज्य स्तरीय निवड प्रक्रियेला शनिवारी हायकोर्टानं स्थगिती दिली. या प्रक्रियेत आईस रिंकमध्ये आईस स्केट्सच्य सहाय्यानं निवड करण्याऐवजी चक्क सीमेंट टर्फवर रोलर स्केट्स घालून आईस हॉकी खेळायला लावत खेळाडूंची निवड करण्याचा अजब कारभार सुरू असल्याबद्दल हायकोर्टानं तीव्र नाराजी व्यक्त केली.
संघटनेची सारवासारव अयशस्वी : या स्थगितीविरोधात आईस हॉकी असोसिएशन ऑफ महाराष्ट्रानं तातडीने हायकोर्टात धाव घेतली होती. ज्यावर बुधवारी (२१ जानेवारी) न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती अभय मंत्री यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. तेव्हा संघटनेच्यावतीने प्रशांत चव्हाण यांनी आपलं प्रतिज्ञापत्र सादर केले. संघटनेच्यावतीने कोर्टात सांगण्यात आले की, राज्यात आईस हॉकीचं रिंक उपलब्ध नाही. त्यामुळे इथे रोलर स्केटवर त्यांच्या शारिरीक कौशल्याची चाचणी घेऊन त्यांना पुढील सरावाकरता देहरादूनला पाठवले जाते. उद्या महाराष्ट्राच्या टीमचा पहिला सामना होणार आहे. त्यामुळं तो त्यांना खेळू द्यावा, अशी विनंती कोर्टाकडे करण्यात आली. मात्र हे आम्हाला पटलेलं नाही, असं हायकोर्टानं सांगितलं. तसंच ३०–३५ डिग्रीत रोलर स्केटवर निवड केलेल्या खेळाडूंना तुम्ही उणे तापमानात आईस रिंकवर उतरवणार आहात का?, असा सवाल करत प्रशांत चव्हाण हे कोण? जर ते समितीवर आहेत, तर त्यांचं नाव यादीत का नाही?, त्यामुळं हे प्रतिज्ञापत्र ग्राह्य धरताच येणार नाही, असं स्पष्ट करत हायकोर्टानं ते फेटाळून लावत संघटनेला कोणताही दिलासा देण्यास नकार देत दिलेली स्थगिती हटवण्यास नकार दिला.
काय आहे प्रकरण? : या वर्षी लेह–लडाख इथं होणाऱ्या खेलो इंडिया विंटर गेम्सकरता महाराष्ट्रात विविध खेळांत राज्यस्तरावरील संघ निवडीची प्रक्रिया पुण्यातील बालेवाडी

## अभिषेक शर्माने मोडला कोहलीचा रेकॉर्ड!

### अशी कामगिरी करणारा ठरला तिसराच फलंदाज

**नागपूर:** भारत आणि न्यूझीलंड या दोन्ही संघांमध्ये ५ टी–२० सामन्यांच्या मालिकेला सुरूवात झाली आहे. मालिकेतील पहिला सामना नागपूरच्या विदर्भ क्रिकेट असोसिएशनच्या मैदानावर सुरू आहे. या सामन्यात न्यूझीलंडने नाणेफेक जिंकून भारतीय संघाला प्रथम फलंदाजी करण्याचं आमंत्रण दिलं. प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाला सुरूवातीला २ मोठे धक्के बसले. पण त्यानंतर अभिषेक शर्माने न्यूझीलंडच्या गोलंदाजांची चांगलीच धूलाई केली. अभिषेकने ३५ चेंडूंचा सामना करत ८४ धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर त्याने मोठा विक्रम आपल्या नावावर केला आहे.अभिषेक शर्मा हा


भारताचा स्टार सलामीवीर फलंदाज अभिषेक शर्माने विराट कोहलीचा रेकॉर्ड मोडून काढला आहे.

आपल्या स्फोटक फलंदाजीसाठी ओळ–खला जातो. न्यूझीलंडविरूद्धच्या पहिल्या सामन्यातही त्याने पहिल्या चेंडूपासून तुफान फटकेबाजी केली. अभिषेकने २२ चेंडूंचा सामना करत आपलं अर्धशतक पूर्ण केलं. हे न्यूझीलंडविरूद्ध कुठल्याही भारतीय फलंदाजाने झळकावलेलं सर्वात वेगवान अर्धशतक आहे. त्याला शतक पूर्ण करण्याची संधी होती. पण त्याचं शतक अवघ्या १६ धावांनी हुकलं. पण ८२ धावा पूर्ण करताच त्याने टी–२० क्रिकेटमध्ये ५००० धावा पूर्ण केल्या आहेत.अभिषेक शर्माने न्यूझीलंडविरूद्धच्या सामन्यात ८२ धावांचा पल्ला गाठताच टी–२० क्रिकेटमध्ये ५००० धावा पूर्ण केल्या आहेत. यासह तो टी–२० क्रिकेटमध्ये सर्वात जलद ५००० धावा करणारा तिसरा फलंदाज ठरला आहे. भार–ताचा माजी फलंदाज विराट कोहलीने टी–२० क्रिकेटमधील १६७ डावात ५००० धावांचा पल्ला गाठला होता. या सामन्यात फलंदाजीला येण्यापूर्वी त्याने १६४ डावात ४९१७ धावा केल्या होत्या. आता १६५ व्या डावात त्याने टी–२० क्रिकेटमध्ये ५००० धावा पूर्ण केल्या आहेत.टी–२० क्रिकेटमध्ये सर्वात जलद ५००० धावा करण्याचा विक्रम हा केएल राहुलच्या नावावर आहे. केएल राहुलने टी–२० क्रिकेटमध्ये फलंदाजी करताना १४३ डावात ५००० धावांचा पल्ला गाठला होता. तर या यादीत दुसऱ्या स्थानी असलेल्या शुबमन गिलने १५४ डावात ५००० धावांचा पल्ला गाठला होता. या यादीत विराट कोहली तिसऱ्या स्थानी होता. पण अभिषेक शर्माने हा विक्रम मोडून काढला आहे. अभिषेक शर्मा हा टी–२० क्रिकेटम ध्ये सर्वात वेगवान ५००० धावा पूर्ण करणारा तिसरा भारतीय



35 चेंडूत

# श्री गुरु तेग बहादूर : मानवजातीचे खरे तारणहार

'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या शहिदीला ३५० वर्ष पुर्ण होत असल्याने महाराष्ट्र शासन आणि श्री गुरु तेग बहादूर साहिबजी ३५० वा शहिदी समागम राज्यस्तरीय समिती मार्फत नांदेड येथे २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी कार्यक्रम होत आहे. या निमित्ताने श्री गुरु तेग बहादूरजी यांच्या मानवजातीच्या कल्याणासाठी केलेल्या अनमोल कार्याची ही माहिती...

महान योद्धा, आध्यात्मिक व्यक्तिमत्त्व आणि मातृभूमीचे प्रेमी नववे शीख गुरू श्री गुरु तेग बहादूरजी यांनी केलेल्या सर्वोच्च बलिदानाची मानवता सदैव ऋणी राहील. त्यांनी विश्वबंधुता आणि धार्मिक स्वातंत्र्याचा संदेश दिला. धर्म, मातृभूमी आणि लोकांच्या हक्कांसाठी त्यांनी जाती-धर्माचा विचार न करता सर्वस्वाचा त्याग केला. म्हणूनच त्यांना 'हिंद दी चादर' या दुर्मिळ सन्मानाने गौरवण्यात आले. आपण श्री गुरु तेग बहादूरजींचा ३५० वा शहिदी समागम वर्ष साजरा करत असताना, धार्मिक स्वातंत्र्याचे महत्त्व आणि मानवजातीच्या व मातृभूमीच्या कल्याणाविषयी शिकवण देणाऱ्या त्यांच्या महान आदर्शांना पुन्हा समर्पित करणे आवश्यक आहे. अतुलनीय श्री गुरु तेग बहादूरजींनी आपल्याला निर्भयपणे मुक्त जीवन जगण्याची शिकवण दिली. मुघल सम्राट औरंगजेबाने त्यांच्यावर आणि त्यांच्या कुटुंबावर केलेल्या अत्यंत छळास ते शरण गेले नाहीत, तर दैवी शांततेने तो सहन केला. त्यागमल ते तेग बहादूर असे झालेले त्यांचे परिवर्तन मानवी इतिहासात फार कमी समांतर असलेली धार्मिक दृढता, औचित्य, नैतिकता आणि शौर्याची कथा आहे. त्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली, पण सत्याचा मार्ग सोडला नाही. त्यांच्या देवत्वाची अशी शक्ती होती की जेव्हा त्यांच्या शिष्यांना त्यांच्या समोर मारण्यात आले, तेव्हा ते खोल ध्यानात राहिले. जेव्हा त्यांनी स्वतः परम त्याग केला, तेव्हाही ते ध्यानात मग्न होते. श्री गुरु तेग बहादूरजी म्हणाले की धर्म हा केवळ पूजा-पाठ नसून कर्तव्य आहे आणि एक आदर्श जीवनपद्धती आहे. आजच्या तरुण पिढीने श्री गुरु तेग बहादूरजींच्या जीवनातून, चारित्र्यातून आणि त्यागातून प्रेरणा घेऊन मानवता आणि नैतिक मूल्ये अंगीकारण्याची गरज आहे, जेणेकरून भारत पुन्हा विश्वगुरू होईल. अत्याचार आणि अन्यायापुढे झुकण्यास त्यांनी ठाम नकार दिला. त्यांनी आदर्श आणि तत्त्वांच्या मार्गावर चालण्याची निवड केली. काश्मिरी पंडितांचे एक शिष्टमंडळ श्री गुरु तेग बहादूरजींना भेटण्यासाठी आजच्या श्री आनंदपूर साहिब येथे आले, ज्याला चक्क नानकी असेही म्हणतात. त्यांचे म्हणणे धीराने ऐकून घेतल्यानंतर, त्यांनी त्यांना औरंगजेबाला किंवा त्याच्या माणसांना सांगण्यास सांगितले की जर त्यांचे गुरू धर्म सोडतील, तरच ते आपला धर्म सोडतील. त्यानंतर औरंगजेबाने केलेले कारनामे इतके भयानक होते की आजही त्यांची आठवण झाल्यावर अंगावर काटा उभा राहतो. श्री गुरु तेग बहादूरजी आणि त्यांच्या तीन भक्तांना -भाई सती दास, भाई मती दास आणि भाई दयाला - बंदिवान करण्यात आले. त्यांनी इस्लाम स्वीकारण्यास नकार दिल्यावर त्या उदात्त त्रिकूटांना त्यांच्या गुरूंसमोर फाशी देण्यात आले. त्यांनी धर्मासाठी सर्वोच्च बलिदान दिले. इ.स. १६७५ मध्ये श्री गुरु तेग बहादूरजींनी अत्यंत शांतपणे हौतात्म्य पत्करले. जुन्या दिल्लीतील चांदणी चौकातील गुरुद्वारा शीशगंज साहिब हे 'त्याग' आणि 'बलिदान' यांच्या अंतिम गाथेचे प्रतीक आहे, ज्याला मानवी इतिहासात तोड नाही. भाई जैता सिंग यांनी श्री गुरु तेग बहादूरजींचे पवित्र शीश श्री आनंदपूर साहिब येथे नेले, जे जगभरातील शीखांसाठी सर्वात पवित्र स्थळांपैकी एक आहे. त्यांच्या बलिदानामुळे 'वसुधैव कुटुंबकम्' या तत्त्वावर आधारित प्राचीन सभ्यता आणि संस्कृती केवळ नष्ट होण्यापासून वाचली नाही, तर एक दृढ आणि सर्वसमावेशक राष्ट्र म्हणून उदयास येण्याच्या आपल्या सामूहिक प्रयत्नांमध्ये तो एक ऐतिहासिक टप्पा ठरला. शीख धर्माचा पाया हा मानवी इतिहासातील सामान्य विकास नव्हता, तर तो सर्व प्रकारच्या अत्याचारांविरुद्ध मानवतेची ढाल बनला. ही एक महान परंपरा होती आणि आजही आहे. नववे शीख गुरू श्री गुरु तेग बहादूरजींनी केवळ लोकांचा धर्मरक्षणाचा संकल्प जपला आणि बळकट केला नाही, तर शीख धर्माला महानतेच्या पुढील स्तरावर नेले. श्री गुरु तेग बहादूरजींना माहीत होते की त्यांच्या भक्तांनी कोणताही पश्चात्ताप न करता धर्मासाठी किंमत मोजली. त्यांनी सर्व मोह नाकारले, सर्व वेदना आणि त्रास सहन केले, पण अश्रू ढाळले नाहीत. धर्मकार्यावरील त्यांची बांधिलकी आणि श्रद्धा अतूट होती. श्री गुरु तेग बहादूर यांचे जीवन हे धर्म आणि मानवजातीच्या कल्याणासाठी केलेल्या अतुलनीय बलिदानांचे सर्वोच्च उदाहरण आहे. औरंगजेबाच्या क्रूरतेपुढे त्यांनी कधीही शरणागती पत्करली नाही. प्रत्येक प्रश्नाला त्यांचे उत्तर स्पष्ट होते - मी शीख आहे आणि शीखच राहणार! श्री गुरु तेग बहादूरजींच्या शिकवणीतून आणि त्यागातून आपल्याला अनेक आणि बहुआयामी धडे मिळतात. त्यांचा त्याग, सत्यावरील अढळ विश्वास, अहिंसा आणि सर्वांप्रती परोपकारी दृष्टीकोन आजही आपल्यासाठी प्रेरणादायी आहे. अंधश्रद्धा, जातीय भेदभाव आणि अस्पृश्यतेविरुद्ध त्यांनी संघर्ष केला, जेणेकरून प्रत्येक मानवाला आपल्या आवडीचे जीवन जगता येईल. धर्म हे सर्वांचे कर्तव्य आहे. खरा धर्म आपल्याला सर्वांशी चांगले वर्तन करण्याची आणि समाजाची शक्य तितकी सेवा करण्याची शिकवण देतो. त्यांनी दुर्बल आणि वंचितांच्या बाजूने ठामपणे उभे राहिले. त्यांचे पुत्र श्री गुरु गोविंद सिंगजी यांनी केवळ वडिलांची तत्त्वे आणि मूल्ये जपली नाहीत, तर खालसा निर्माण करून त्यांना पुढे नेले, जो धार्मिकता आणि न्यायासाठी लढण्याचे प्रतीक आहे. आपण श्री गुरु तेग बहादूरजींचे हे महान वचन सदैव लक्षात ठेवले पाहिजे -आपण आपले जीवन सुख-दुःखात तसेच मान-अपमानात समान भावनेने जगले पाहिजे. त्यांच्या शिकवणीतून जीवनाचा उद्देश तसेच समता, समरसता आणि त्याग यांचे महत्त्व अधोरेखित होते. श्री गुरु तेग बहादूरजींचे महान शब्द हे मानवतेसाठी ऊर्जा आणि ज्ञानाचे चिरंतन स्रोत आहेत. गुरूंच्या शब्दांच्या मधुर पठणाचा भक्तांवर खोल परिणाम होत असे. त्यांनी अत्यंत शांततापूर्ण आणि मानवतावादी मार्गाने निरंकुश व धर्मांध शासकाशी संघर्ष केला. त्यांची शिकवण कालातीत आहे आणि येणाऱ्या पिढ्यांना सदैव प्रेरणा देत राहील. श्री गुरु तेग बहादूर यांचे जीवन आपल्याला प्रत्येक परिस्थितीला शांततेने आणि खंबीरतेने सामोरे जाण्याची तसेच सौहार्द, न्याय, समता आणि समरसतेवर आधारित सामाजिक व्यवस्था निर्माण करण्याची प्रेरणा देते.

**-अनिल आलुरकर**
**उपसंचालक (माहिती)**
**विभागीय माहिती कार्यालय अमरावती**

# भाजपाचे युवा नेते ऋषिकेश कराड यांच्यासह अनेकांचे जि.प., पं.स. निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल

**लातूर/प्रतिनिधी:** भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांनी रेणापूर तालुक्यातील पानगाव जिल्हा परिषद गटातून भारतीय जनता पार्टीच्या वतीने मोठ्या उत्साहाच्या वातावरणात उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी कामखेडा गटातून सौ. सरिता शंकरराव भिसे, खरोळा गटातून सौ. शिवकन्या महेंद्र गोडभरले आणि पोहरेगाव गटातून सौ. मनीषा दशरथ सरवदे यांच्यासह पंचायत समिती गणातील उमेदवारांनी बुधवार २१ जानेवारी रोजी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. यावेळी भाजपाचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लातूर जिल्हा परिषद आणि रेणापूर पंचायत समितीसाठी येत्या ५ फेब्रुवारी रोजी रोजी मतदान होणार असून भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीच्या वतीने पानगाव जिल्हा परिषद गटातून युवा नेते ऋषिकेशदादा कराड, पानगाव पंस गणातून सौ. रंजना मारुती गालफाडे, कोष्टगाव पंस गणातून सौ. जयश्री संजय डोंगरे; कामखेडा जिप गटातून सौ. सरिताबाई शंकरराव भिसे, कामखेडा पंस गणातून शरद देरेकर, मोटेगाव पंस गणातून संतोष चव्हाण; खरोळा जिल्हा परिषद गटातून सौ. शिवकन्या महेंद्र गोडभरले, खरोळा पंस गणातून सौ. शितल प्रताप राऊतराव, कारेपूर पंस गणातून सौ. अंजली राजेश काळे आणि पोहरेगाव जिल्हा परिषद गटातून सौ. मनीषा दशरथ सरवदे, पोहरेगाव पंस गणातून आकाश भुतके, निवाडा पंस गणातून विष्णू गोरे यांनी आपले उमेदवारी अर्ज रेणापूर येथील तहसील कार्यालयात दाखल केले.

यावेळी माजी आमदार ॲड. त्र्यंबकनाना भिसे, ज्येष्ठ नेते ओमप्रकाश गोडभरले, राजेश कराड, व्यंकटराव अनामेमामा, शंकरराव भिसे, अनंत चव्हाण, नवनाथ भोसले, अनिल भिसे, सतीश आंबेकर, सुकेश भंडारे, दशरथ सरवदे, महेंद्र गोडभरले, अभिषेक आकनगिरे, विजय गंभीरे, ॲड. मनोज कराड, सुनील चेवले,



रवींद्र नागरगोजे, नामदेव बोंबडे, विष्णू गोरे, राम मोरे, तेजस कराड, श्रीकृष्ण मोटेगावकर, विजय चव्हाण, श्रीकृष्ण जाधव, रवींद्र नागरगोजे, लक्ष्मण यादव, दिगंबर येडले, भागवत गीते, सुंदर घुले, माधव घुले, महादेव जाधव, नारायण राठोड, दत्ता सरवदे, निवृत्ती लहाने, अच्युत कातळे, महेश गाडे, मारूफ आत्तार, वैजनाथ लहाने, राजकुमार आलापुरे, उत्तम चव्हाण, गोविंद देशमुख, गुणवंत जोगदंड, नानासाहेब कस्पटे, श्रीकृष्ण पवार, शिवाजी जाधव, संपत कराड, संजय केंद्रे, नवनाथ माने, प्रकाश केदार, बालाजी केंद्रे, अभिजीत मद्दे, दिलीप पाटील, राम भताने, नरेश चपटे, सुधाकर काळे, रमाकांत फुलारी, बालासाहेब शेप, कुलभूषण संपत्ते, मेघराज जाधव, रमेश पारिख, रमेश केंद्रे, मच्छिंद्र चक्रे, मदन दहिफळे, लक्ष्मण खलंग्रे, दत्तात्रेय कस्तुरे, नाथराव गीते, दत्तात्रेय मुंडे, राम बडे, मारुती गालफाडे, धम्मानंद घोडके, श्रीमंत नागरगोजे, नरसिंग येलगटे, विठ्ठल डोंगरे, रानबा मुळे, संजय डोंगरे, मच्छिंद्र चक्रे, नंदकुमार वल्लमपल्ले, संतोष राठोड, योगेश राठोड, रमा चव्हाण, विकास सरवदे, बसवराज गुरफळे, प्रकाश जाधव, वैजनाथ कांदे यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे लोकप्रतिनिधी पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पथनाट्यातून मांडली श्री गुरु तेग बहादूरजींच्या अमर बलिदानाची गाथा
## लातूर जिल्हास्तरीय शालेय पथनाट्य स्पर्धेत ३४ विद्यार्थ्यांचा सहभाग



**लातूर प्रतिनिधी:** 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या यांच्या ३५० व्या शहीदी समागमनिमित्त लातूर जिल्हा शिक्षण विभागामार्फत 'हिंद दी चादर' पथनाट्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी पथनाट्यातून श्री गुरु तेग बहादूरजी यांची जीवनगाथा उभी केली. हा उपक्रम श्री गुरु तेग बहादूरजी यांच्या अमर बलिदानाची आठवण करून देणारा आणि धार्मिक सहिष्णुता, मानवतावाद व धैर्याचे मूल्य विद्यार्थ्यांमध्ये रुजविणारा ठरला.

या स्पर्धेत लातूर जिल्ह्यातील विविध शाळांमधील ३४ विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला. यामध्ये अहमदपूर येथील संत ज्ञानेश्वर विद्यालय, औसा तालुक्यातील सेलू येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, भादा येथील जिल्हा परिषद प्रशाला, लामजना येथील अनुसूचित जाती व नवबौध्द मुलांची शासकीय निवासी शाळा यासह इतर शाळातील विद्यार्थ्यांचा समावेश होता.

दयानंद कला महाविद्यालयाचे उपप्राचार्य दिलीप नागरगोजे, स्पर्धेचे समन्वयक सतीश भापकर, परीक्षक विजय म्हस्के व हरी कुंभार यावेळी उपस्थित होते.

श्री गुरु तेग बहादूरजींना हिंद दी चादर अर्थात भारताची ढाल म्हणून ओळखले जाते, त्यांनी सहिष्णुता, मानवतावादासाठी आपले बलिदान दिले. त्यांच्या शहीदीला ३५० वर्षे पूर्ण झाली असून, यानिमित्ताने राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागामार्फत २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी नांदेड येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

यानिमित्ताने जनजागृतीसाठी लातूर शिक्षण विभागामार्फत जिल्ह्यात विविध स्पर्धा व उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

# वीरशैव तेली समाज, लातूर हळदी कुंकू कार्यक्रम संपन्न




**लातूर/ प्रतिनिधी:** वीरशैव तेली समाज लातूर,महिला मंडळ आयोजित मकर-संक्रांती निमित्त हळदी कुंकू समारंभ दिनांक १७ जानेवारी रोजी,वीरशैव सांस्कृतिक भवन लातूर येथे भव्य स्वरूपात पार पडला.याप्रसंगी हळदी कुंकू संमारंभाचे उद्घाटन महात्मा बसवेश्वरच्या प्रतिमेचे पूजन करून हळदी कुंकू महिला समिति प्रमुख सौ.सारिका क्षीरसागर यांनी केले.कार्यक्रमाची सुरवात सौ. सारिका क्षीरसागर,सौ. दिपाली रजपूत,सौ. प्रियंका देशमाने,सौ. रोहिणी लोखंडे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून झाली. या प्रसंगी ग्रीन लातूर वृक्ष टीम तर्फे सौ. दीपाली राजपूत यांनी वृक्ष लागवडीचे महत्व उपस्थित महिलांना सांगून ग्रीन लातूर वृक्ष टीम तर्फे सर्व महिलांना ५०० रोप वाण म्हणून देण्यात आले.या कार्यक्रमात महिलांचे सांस्कृतिक खेळ आणि लहान मुलींचे डान्स घेण्यात आले. कार्यक्रम स्थळी सौ. प्रियंका देशमाने व सौ.विद्या टाकणे,सौ.वैशाली देशमाने यानी विठ्ठल रुक्मिणी

यांच्या मूर्ती सभोवती आकर्षक सजावट केली होती व सर्व महिलांचे प्रमुख आकर्षण केंद्र बनली होती. सुबक आणि सुंदर रांगोळी सर्वांचे लक्ष वेधून घेत होती त्यासाठी सौ.अश्विनी क्षीरसागर यांनी मेहनत घेतली कार्यक्रमाचे सूत्र संचालन सौ. पल्लवी व्यवहारे यांनी केले.

या कार्यक्रमासाठी सर्व महिला मंडळा कडून अतिशय नियोजन बद्ध व काटेकोर पणे कार्यक्रमाची आखणी करण्यात आली होती त्यामध्ये प्रामुख्याने सौ. मेघा भुजबळ,सौ. वनिता व्यवहारे,सौ. प्राजक्ता लोखंडे. सौ.अश्विनी लोखंडे, सौ.रागिणी लोखंडे ,सौ.अनुसया देशमाने,सौ.मनीषा भुजबळ,सौ.संगीता उदगिरे,सौ.वर्षा चोपडे,सौ. सोनाली होकळे, सौ. सुनीता नाईक सौ. माया कलशेट्टी सौ.सुरेखा कलशेट्टी,सौ.रेखा कलशेट्टी सौ. ज्योति फेसगाळे,सौ. दिपाली म्हेत्रे,सौ. अपर्णा फेसगाळे,सौ.उषा टाकणे,सौ.दिपाली नवगिरे सौ. पूजा नाईक सौ.अंजली क्षीरसागर सौ. वर्षा पुदाले यांनी कार्यक्रम पार पाडला . याप्रसंगी समाजातील सर्व महिला आपल्या लहान मुला बाळा सहित उत्साहाने उपस्थित होत्या. कार्यक्रम व्यवस्थित पार पाडण्यासाठी वीरशैव तेली समाज लातूर महिला समिति मधील सर्व सदस्य यांनी महत्वाचे योगदान दिले.


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९


# उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे यांनी दयानंदमध्ये कॉपीमुक्त अभियान शपथ दिली



**लातूर/ प्रतिनिधी:** उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ १२वी) व माध्यमिक शालात प्रमाणपत्र (इ.१०थी) फेब्रु-मार्च-२०२६ परीक्षेकरिता कॉपीमुक्त अभियानाअंतर्गत जनजागृती सप्ताह दिनाक सोमवार दि.१९ जानेवारी २०२६ ते सोमवार दिनांक २६ जानेवारी २०२६ या कालावधीमध्ये आयोजित केला आहे.त्यात

स्थानिक लोकप्रतिनिधी, शाळा विकास व व्यवस्थापन समिती सदस्य,गावातील प्रतिष्ठित नागरिक व महाविद्यालयाचे मुख्याध्यापक व प्राचार्य,शिक्षक यांना संयुक्त सभेमध्ये कॉपीमुक्त अभियान शाळा पातळीवर अंमलबजावणी करणे,कॉपीमुक्त अभियानाची शपथ सर्व शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयामध्ये परिपाठाचे वेळी घेणे.शाळा स्तरावर मंडळ शिक्षासूचीचे वाचन करणे, मंडळाच्या उत्तरपत्रिकेच्या मुखपृष्ठाच्या मागील बाजूस असलेल्या सूचना व प्रवेश पत्रावील (क्रश्रश्र ढळलज्ञशीं) सूचनांचे वाचन करणे गैरमार्ग केल्यास होणाऱ्या परिणामांची जाणीव करून देणे. परीक्षा काळात विद्यार्थ्यांनी घ्यावयाचा आहार व आरोग्याची काळजी याबाबत तज्ज्ञांमार्फत शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयामध्ये पालक व विद्यार्थ्यांना उद्बोधन करणे.परीक्षेला सामोरे जाताना अभ्यासाची तयारी, परीक्षा तणावमुक्त वातावरणात कशी देता येईल, चित्रफीत विद्यार्थ्यांना दाखविणे,कॉपीमुक्त अभियानाच्या जागृतीसाठी कॉपीमुक्ती घोषवाक्यासह शाळा परिसरात जनजागृती फेरी काढणे,ग्रामसभा बैठकीमध्ये मुख्याध्यापक/शिक्षक यांनी कॉपीमुक्त अभियानासंदर्भात वरील विषयांबाबत माहिती देणे इत्यादी उपक्रम राबवावेत असे परिपत्रकात नमूद केले आहे

त्याचाच भाग म्हणून आज दयानंद कला महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ.शिवाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली कॉपीमुक्त अभियान शपथ फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या इ. १० वी व इ. १२ वी परीक्षेस परिपूर्ण अभ्यास करूनच सामोरे जाईन. मी उत्तीर्ण होण्यासाठी परीक्षेत कोणत्याही गैरमार्गाचा अवलंब करणार नाही किंवा परीक्षेपूर्वी गैरमार्गाचा विचारही करणार नाही. जर कोणी गैरमार्गाचा विचार करत असेल तर त्यास गैरमार्गापासून परावृत्त करेन. परीक्षेला सामोरे जाताना मंडळ सूचनांचे व नियमांचे काटेकोरपणे पालन करेन. मी सातत्याने अभ्यास करेन व प्रश्नपत्रिका सोडविण्याचा सराव करेन. तसेच परीक्षेस आत्मविश्वासाने, निर्भिडपणे, तणावविरहित सामोरे जाईन व चांगल्या गुणाने उत्तीर्ण होऊन माझ्या शाळेचे, आई वडीलांचे व गुरूजनांचे नाव उज्ज्वल करेन. ही शपथ उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे यांनी दिली. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ.अंजली जोशी, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित, स्टाफ सचिव प्रा सुरेश क्षीरसागर, परीक्षा विभाग प्रमुख प्रा जीगाजी बुद्रुके, सदस्य प्रा दशरथ ननावरे, डॉ सुधीर गाडवे,शिक्षण विभागाचे श्री सतीश भापकर, सर्व सहकारी प्राध्यापक व कार्यालयीन सहकारी, विद्यार्थी उपस्थित होते.

# निवृत्ती वेतन नसलेल्या ६५ वर्षांवरील माजी सैनिक व विधवांची माहिती सादर करण्याचे आवाहन

धाराशिव -(जिमाका) जिल्ह्यातील माजी सैनिकांच्या व्याख्येत न बसणारे तसेच सैन्यातील निवृत्ती वेतन मिळत नसलेल्या ६५ वर्षांवरील सैनिक व सैनिकांच्या विधवांची माहिती संकलित करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.या अनुषंगाने संबंधित पात्र व्यक्तींचा तपशील दिनांक ५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत सैनिक कल्याण विभाग,पुणे येथे सादर करण्यात येणार आहे.

त्या अनुषंगाने जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय,धाराशिव यांनी जिल्ह्यातील पात्र सैनिक व विधवांना आपली माहिती २ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजेपर्यंत कार्यालयात सादर करण्याचे आवाहन केले आहे.

या योजनेसाठी पात्रतेच्या अटी स्पष्ट करण्यात आल्या असून,सैन्यसेवा केलेली मात्र माजी सैनिकांच्या व्याख्येत न बसणारी ६५ वर्षांवरील व्यक्ती (विधवांसाठी वयोमर्यादा लागू नाही),सैन्यसेवेतून बडतर्फ झालेला नसावा, घडइ/नडइ कडून चरितार्थासाठी आर्थिक मदतीस अपात्र असलेली व्यक्ती,अर्धसैनिक बलातील नसावा तसेच ढशीीळींळरश्र -गीू मध्ये सेवा केलेल्या सैनिकांचा यामध्ये समावेश करावा.यासोबतच,ज्यांच्याकडे चरितार्थासाठी कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही अशाच व्यक्तींची नावे सादर करण्यात येणार आहेत.

पात्र सैनिक व विधवांनी आवश्यक कागदपत्रांसह वेळेत माहिती सादर करून या प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय,धाराशिव यांनी केले आहे.

# स्पर्श पोर्टलवरील अडचणी दूर करण्यासाठी धाराशिवमध्ये CSC केंद्रे सुरू होणार ; माजी सैनिकांकडून अर्ज मागविले

धाराशिव दि.२१ जानेवारी (जिमाका) राज्य सैनिक बोर्ड व जिल्हा सैनिक बोर्ड यांच्या निर्देशानुसार माजी सैनिकांना स्पर्श प्रणाली (SPARSH Portal) वापरताना येणाऱ्या अडचणी दूर करण्याच्या दृष्टीने CSC (Common Service Centres) स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.त्यानुसार जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या आवारात तसेच जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात एक CSC केंद्र सुरू करण्यात येणार आहे.ही केंद्रे चालविण्यासाठी इच्छुक माजी सैनिकांची आवश्यकता असल्याची माहिती देण्यात आली आहे.

या अनुषंगाने जिल्ह्यातील सर्व माजी सैनिकांना कळविण्यात येते की, उडउ चालविण्यास इच्छुक असलेल्या माजी सैनिकांनी आपली नावे व अर्ज आवश्यक संबंधित कागदपत्रांसह २८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजेपर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, धाराशिव येथे सादर करावेत,असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय,धाराशिव यांच्या वतीने करण्यात आले आहे.

या संदर्भात अधिक माहितीसाठी किंवा मार्गदर्शनासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय,धाराशिव येथे संपर्क साधावा. संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक ०२४७२-२२२५५७ तसेच भ्रमणध्वनी क्रमांक ७५८८५२७५५४ उपलब्ध असून,इच्छुक माजी सैनिकांनी वेळेत अर्ज सादर करून या उपक्रमात सहभागी व्हावे,असेही आवाहन करण्यात आले आहे.

# स्वाधार योजनेतील २५९ विद्यार्थ्यांचे अर्ज त्रुटीग्रस्त; ३१ जानेवारीपर्यंत त्रुटीपूर्तता व हार्डकॉपी सादर करावी

धाराशिव दि.२१ जानेवारी (जिमाका) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सन २०२५-२६ अंतर्गत अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचे जाहीर आवाहन करण्यात आले आहे.सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय, धाराशिव यांच्या वतीने त्रुटीपूर्तता व अर्जाची हार्डकॉपी जमा करण्याची अंतिम मुदत दिनांक ३१ जानेवारी २०२६ निश्चित करण्यात आली आहे.

शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या किंवा शासकीय वसतिगृहात प्रवेश न घेतलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील इयत्ता ११ वी,१२ वी तसेच व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण घेता यावे,यासाठी या योजनेअंतर्गत भोजन भत्ता,निवास भत्ता,निर्वाह भत्ता व इतर शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. आयुक्त,समाज कल्याण यांच्या दिनांक ३१ जुलै २०२४ च्या परिपत्रकानुसार वसतिगृह प्रवेश व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना https://hmas.mahait.org या पोर्टलवर ऑनलाईन करण्यात आली आहे.

त्या अनुषंगाने सन २०२५-२६ करिता स्वाधार योजनेसाठी एकूण १७५८ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी २५९ विद्यार्थ्यांचे अर्ज त्रुटीमध्ये आढळून आले आहेत. तसेच ११२ विद्यार्थ्यांनी अद्यापपर्यंत ऑनलाईन प्रणालीवर भरलेल्या अर्जाची प्रिंट व आवश्यक कागदपत्रांची हार्डकॉपी समाज कल्याण कार्यालयात जमा केलेली नाही.

तरी ज्या विद्यार्थ्यांनी अद्यापपर्यंत त्रुटीपूर्तता केलेली नाही तसेच अर्जाची हार्डकॉपी (अर्ज व आवश्यक कागदपत्रांचा संच) समाज कल्याण कार्यालय,धाराशिव येथे सादर केलेली नाही,अशा विद्यार्थ्यांनी अंतिम मुदत ३१ जानेवारी २०२६ पूर्वी त्रुटीपूर्तता करून आवश्यक कागदपत्रे कार्यालयात जमा करावीत.विहीत मुदतीत त्रुटीपूर्तता व कागदपत्रे जमा न केल्यास संबंधित अर्ज अपात्र ठरविण्यात येईल,याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.याबाबतीत कोणतीही अडचण असल्यास सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण, धाराशिव या कार्यालयाशी संपर्क साधावा,असे आवाहन श्री.सचिन कवले,सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण,धाराशिव यांनी केले आहे.

# निवृत्तीवेतनधारकांच्या प्रश्नांच्या निराकरणासाठी २८ जानेवारीला धाराशिव येथे पेन्शन अदालत

धाराशिव,दि.२१ जानेवारी (जिमाका) जिल्ह्यातील सर्व कार्यालय प्रमुख तसेच आहरण व संवितरण अधिकारी यांना कळविण्यात येते की,महालेखाकार कार्यालय,नागपूर व कोषागार कार्यालय,धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने निवृत्तीवेतनधारकांच्या विविध समस्यांचे निराकरण करण्याच्या उद्देशाने २८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता कोषागार कार्यालय,धाराशिव येथील बैठक हॉलमध्ये पेन्शन अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

या अनुषंगाने जिल्हा कोषागार अधिकारी, धाराशिव यांच्या वतीने जिल्ह्यातील सर्व कार्यालय प्रमुख,आहरण व संवितरण अधिकारी तसेच निवृत्तीवेतनाशी संबंधित कामकाज करणारे अधिकारी व कर्मचारी आणि सर्व निवृत्तीवेतनधारक यांनी आपल्या प्रलंबित अथवा इतर समस्यांचे निराकरण करून घेण्यासाठी आवश्यक ते अभिलेख व कागदपत्रांसह वरील ठिकाणी उपस्थित राहावे.

निवृत्तीवेतनधारकांच्या समस्या तात्काळ मार्गी लावण्याच्या दृष्टीने या पेन्शन अदालतीचा लाभ घ्यावा,असे आवाहन श्रीमती.अर्चना नरवडे,जिल्हा कोषागार अधिकारी,धाराशिव यांनी केले आहे.

# पोलिसांनी केली जुगार विरोधी कारवाई

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत जुगार विरोधी कारवाई दरम्यान तुळजापूर पोलीसांनी दि.१९.०१.२०२६ रोजी विश्वनाथ कॉर्नर रोड लगत बस स्टॅण्ड चे बाजूस छापा टाकला. यावेळी भारत पुजारी नगर ता. तुळजापूर जि. धाराशिव हे विश्वनाथ कॉर्नर रोड लगत बसस्थानक चे बाजूस मेन बाजार मटका जुगाराचे साहित्या एकुण १,३८० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले तुळजापूर पो. ठाणेच्या पथकास आढळले.तर भिमराव रा. काक्रंबा ता. तुळजापूर जि. धाराशिव हे १८.२५ वा. सु. तुळजापूर शहारातील तुळजापूर ते तुळजापूर खुर्द जाणारे रोडच्या डाव्या बाजूस नगर परिषद च्या मोकळ्या जागेत कल्याण मटका जुगाराचे साहित्या एकुण १,४२० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले तुळजापूर पो. ठाणेच्या पथकास आढळले.यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द स्वतंत्र २ गुन्हे नोंदवले आहेत.

# उमरग्यात चौगुले पॅटर्नचा जलवा! नगरपालिका जिंकल्यानंतर आता जिल्हा परिषद-पंचायत समितीवर निर्णायक चाल

धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- उमरगा तालुक्याच्या राजकारणात माजी आमदार ज्ञानराज चौगुले यांनी पुन्हा एकदा आपली ताकद सिद्ध केली आहे. कोणताही मोठा राजकीय आधार न घेता, केवळ स्वतःच्या नेतृत्वगुणांवर आणि जनसंपर्काच्या जोरावर त्यांनी उमरगा नगरपालिका निवडून आणली. या विजयाने चौगुले पॅटर्नची चर्चा संपूर्ण जिल्ह्यात रंगली असून आता त्याच पॅटर्नचा प्रभाव जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत दिसू लागला आहे. नगरपालिका यशानंतर चौगुले यांनी आता गट व गणनिहाय उमेदवार निवड प्रक्रियेची संपूर्ण यंत्रणा जोरात कार्यान्वित केली आहे. प्रत्येक गटासाठी उमेदवारांची काटेकोर तपासणी सुरू असून, केवळ नावापुरती नव्हे तर उमेदवाराची कामगिरी, सामाजिक बांधिलकी, युवा सहभाग, धडाडी, कर्तृत्व आणि स्वच्छ प्रतिमा या सर्व बाबी कसून तपासल्या जात आहेत. निवडणूक म्हणजे फक्त विजय नव्हे, तर जनतेसाठी काम करणारे नेतृत्व उभे करणे, या भूमिकेतून ज्ञानराज चौगुले स्वतः प्रत्येक उमेदवाराशी संवाद साधत आहेत. उमेदवाराने गावात केलेले काम, लोकांशी असलेला थेट संपर्क, प्रश्न सोडवण्याची क्षमता आणि भविष्यातील दृष्टीकोन-या सर्व मुद्द्यांवर व्यक्तिशः लक्ष दिले जात आहे. युवकांना संधी देत, अनुभवी कार्यकर्त्यांना योग्य स्थान देण्याचा समतोल साधत चौगुले यांनी उभारलेली ही यंत्रणा येत्या निवडणुकीत नवीन समीकरणे घडवणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. उमरग्यात नगरपालिका जिंकून दाखवलेली ताकद आता जिल्हा परिषद-पंचायत समितीवर किती मोठा ठसा उमटवते, याकडे संपूर्ण धाराशिव जिल्ह्याचे लक्ष लागले आहे



# समाजसेवा ही व्यक्तिमत्व विकासाचा पाया-प्राचार्य डॉ. दिलीप गरुड




मुरूम (प्रतिनिधी) - भारताला जगात महासत्ता बनवायचे असेल तर युवकांनी सामाजिक कार्यात पुढाकार घेतला पाहिजे. शिकणे, सेवा करणे आणि पुढे नेणे हीच तरुणांची त्रिसूत्री असून अशा शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, नेतृत्व गुण, सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण होऊन विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. समाजसेवा ही व्यक्तिमत्व विकासाचा पाया असल्याचे प्रतिपादन माजी प्राचार्य डॉ. दिलीप गरुड यांनी केले. मुरूम येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयाच्या वतीने भुसणी, ता. उमरगा येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेच्या शाश्वत विकासासाठी युवक विशेष वार्षिक शिबिराप्रसंगी बुधवारी (ता. २१) रोजी उद्घाटक म्हणून ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार होते. यावेळी माजी प्राचार्य डॉ. अशोक सपाटे, प्राचार्य डॉ. सादक वली, उपसरपंच दशरथ मंडले, श्रीमंत पाटील, सुभाष बिराजदार, राजेंद्र व्हनाजे, महादेव संगशेट्टी, महादेव व्हनाजे, महादेव पाटील, गुलाब हिरमुखे, मुख्याध्यापक प्रेमनाथ आपचे आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस डॉ. गरुड यांनी पुष्पहार घालून अभिवादन करून कुदळ मारून उदघाटन करण्यात आले.

डॉ. गरुड पुढे बोलताना म्हणाले की, आज युवकांमध्ये नैतिक मूल्यांचा ऱ्हास, वाढती स्पर्धात्मकता, बेरोजगारीमुळे तणावग्रस्त जीवन, वाढती व्यसनाधीनता, मोबाईलचा अतिरेकी वापर, अंधश्रद्धा या पार्श्वभूमीवर शिक्षणाकडे वस्तुनिष्ठ व सकारात्मक दृष्टिकोनातून पाहणे गरजेचे आहे. आज विद्यार्थ्यांना सर्व प्रकारच्या भौतिक सुविधा उपलब्ध असताना त्यांनी शिक्षणाबरोबरच मैत्रीपूर्ण जिव्हाळा निर्माण करावा. शिक्षणामुळे माणूस बौद्धिक दृष्ट्या सक्षम आणि प्रगल्भ बनतो, त्यामुळे जीवनमान सुधारते. संत गाडगेबाबा यांच्या कार्याची महती सांगताना भस्म, बुवा, जादूटोणा यांचा आता करूया त्याग. शिक्षण, विज्ञान आणि विवेक हाच समाजाचा बनवूया भाग असे ते शेवटी म्हणाले.

अध्यक्षीय समारोप प्रसंगी म्हणाले की, विद्यार्थ्यांनी शिबिराच्या प्रत्येक उपक्रमात सक्रिय सहभाग घेऊन आपली स्वतंत्र ओळख निर्माण करावी. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. शीला स्वामी यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. सुभाष हुलपल्ले तर आभार प्रा. डॉ. प्रतापसिंग राजपूत यांनी मानले. कार्यक्रमास गावातील बहुसंख्य नागरिक व विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# जळकोटच्या कुलस्वामिनी माध्यमिक आश्रम शाळेत हिंद की चादर: गुरू तेग बहादूर यांना अभिवादन




जळकोट (विजय पिसे)- दिनांक: २१ जानेवारी २०२६ वार बुधवार रोजी श्री कुलस्वामिनी माध्यमिक आश्रम शाळा जळकोट ता. तुळजापूर जि. धाराशिव येथे गुरू तेग बहादूर यांची ३५० वी शहीद शताब्दीचे आयोजन करण्यात आले. सर्व प्रथम महात्मा फुले शिक्षण प्रसारक मंडळ जळकोट चे सचिव तथा प्राचार्य संतोष चव्हाण साहेब यांच्या हस्ते शहीद गुरू तेग बहादूर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रभात फेरी काढून घोषणा देण्यात आल्या.कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री कुलस्वामिनी माध्यमिक आश्रम शाळेचे जेष्ठ शिक्षक नागेंद्र गुरव सरांनी केले यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री संतोष चव्हाण साहेब बोलताना गुरू तेग बहादूर,सिखांचे नववे गुरू आहेत.अन्याय,अत्याचाराच्या विरोधात आवाज उठविला व खंबीरपणे लढा दिला. औरंगजेबाचे मनसूबे पूर्ण होऊ नये म्हणून धर्म व देश रक्षणासाठी बलिदान केले. देशाचे रक्षण केल्यामुळे हिंद की चादर ही उपाधी बहाल करण्यात आली.असे गौरवोद्गार काढले . कार्यक्रमाला शाळेतील शिक्षक श्री रविकिरण चव्हाण सर, देवानंद पांढरे सर, श्री बाळासाहेब मुखम सर, श्री बिळेणसिद्ध हक्के शिक्षकेत्तर कर्मचारी देवकते सुग्रीव, किसन पांचाळ उपस्थित होते यावेळी शाळेत चित्रकला स्पर्धा,वकृत्व स्पर्धा, व निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरण ढोले सरांनी व आभार श्रीमती कल्पना लवंद मॅडम मानले.

# मोटरसायकल अज्ञाताने चोरली

बेंबळी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी धनंजय चंद्रकांत महानुभव, वय २९ वर्षे, रा. नितळी ता. जि. धाराशिव यांची अंदाजे १५,००० किंमतीची मोटरसायकल धनंजय महानुभव यांचे राहते घरासमोरुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-धनंजय महानुभव यांनी दि.१९.०१.२०२६रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन बेंबळी पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**लातूर समाचार धाराशिव**
**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**
**9422472502**
**9175325708**

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649